# प्रकरण दुसरे

## *विष्णूमूर्ती -पूर्वपीठीका*

## विष्णूमूर्ती - पूर्वपीठीका

ज्ञान आणि अज्ञान या द्वंद्वापलीकडे एक शक्ती कार्यरत आहे ,ती म्हणजे ब्रम्ह. खरे तर हे अदृष्य आहे. अस्तित्व नाही म्हणजे शून्य . म्हणजे शून्य हे त्याचे दृष्यरूप आहे ; व ओंकार हे श्राव्यरूप . तर महाविष्णू हे त्याचे सगुण रूप . त्यातूनच विष्णू ,शिव , शक्ती , सूर्य ,गणेश या देवतांचा उगम झाला .

**पै शून्य जै दावावे झाले ,तै बिंदुले एक पाहिजे केले ।**

**तैसे अद्वैत सांगावे बोले , तै द्वैत कीजे ।। ज्ञा.१३. ८८८**

जेव्हा बाकी शून्य दाखविण्याची वेळ येते ,त्यावेळी शून्याबद्दल एक बिंदूले काढावे लागते .त्याप्रमाणे अद्वैत शब्दाद्वारा स्पष्ट करून सांगावयाचे म्हणजे द्वैताचा स्वीकार करूनच स्पष्टीकरण करावे लागते .१

वैदिक व पौराणिक संस्कृतीवर आधारलेल्या आपल्या धर्मात ब्रम्हा ,विष्णू ,महेश यांचे स्थान बरेच वरचे मानले जाते . रज ,सत्व आणि तम या तीन गुणांचे ते प्रतिनिधी आहेत . सृष्टीचे निर्माण ,पालन व शेवट ही प्रमुख कार्ये ब्रम्हदेव ,विष्णू ,शंकर यांची मानली जातात . सृष्टीच्या तीन स्थिती आहेत ; त्या म्हणजे उत्पत्ती , स्थिती आणि लय . यांच्या आधारभूत देवता ब्रम्हा ,विष्णू , महेश या आहेत . या विश्वात निर्मिती ,संवर्धन व प्रलय या प्रक्रिया नित्य चालू आहेत . या प्रक्रियांचे दायीत्व सांभाळणारे तीन देव हिंदू मानतात . निर्मितीची प्रक्रिया सांभाळणारा ब्रम्हदेव .ब्रम्हदेवाने निर्मिलेल्या या जगाचे जतन करणारा देव म्हणजे विष्णू आणि प्रलयकाळी सृष्टीचा विनाश करून नवनिर्मितीसाठी कोरी पाटी उपलब्ध करून देणारा शिव किंवा महादेव. २

या सृष्टीचा प्रतिपाल करणारा मुख्य देव म्हणजे विष्णू आहे ,तो सृष्टीचे तारूण्य व सामर्थ्य जतन करतो .काही कालावधीत तो लोकप्रिय देव म्हणून पुढे आला व तो सर्वमान्य ठरला . आपल्याकडे प्राचीन मूर्तिकडे पाहण्याचा सर्वसामान्य दृष्टीकोन भाविकतेचा असतो . जिथे ओबड धोबड दगडालाही शेंदूर फासून आपण त्याच्यापुढे नतमस्तक होतो ,तेथे दगडातून सुंदर कोरलेल्या या मूर्तिसमोर माथा टेकविणे आपल्याला काय कठीण ? या मूर्तिसमोर माथा टेकविताना तिच्याकडे शास्त्रीय दृष्टीकोनातूनही पाहिले पाहिजे . मूर्तिकाराने धर्म तत्वज्ञान ओतण्याचा प्रयत्न केलेला

असतो . आपण प्रयत्न केला तर या मूर्तिमधून आपला प्राचीन व सामाजिक इतिहासही आपण पाहू शकतो .

वैदिक वाङ्मय हे अफाट आहे . ब-याचश्या देवतांचे जुने धागेदोरे उकलण्याकरिता वैदिक साहित्याचा परामर्श घ्यावा लागतो. तो अत्यावश्यकच असतो . ऋग्वेदात इतस्ततः मंत्रदेवतांचे उल्लेख आले आहेत. त्यापैकी विष्णू हा एक आहे . येथे विष्णूला फार मोठे स्थान नसले तरी ते अगदीच किरकोळही नाही. इ.स. पूर्व १५००- ५०० हा वैदिक काल समजला जातो . इ.सनापूर्वी ग्रीकांसारखे अभारतीयसुद्धा वैष्णव उपासना करीत असत. विष्णूची मांदिरे बांधीत . त्याच्यासमोर गरूड स्तंभाची स्थापना करीत . या गोष्टी विदिशा येथे मिळालेल्या हेलीओडस याने कोरवलेल्या स्तंभ लेखावरून सिद्ध होतात .३

विष्णू च्या मान्यतेचे धागेदोरे ऋग्वेदापर्यंत तर पोहोचलेले आहेतच . कारण ऋग्वेदात सहा सूक्तांमध्ये विष्णूचे उल्लेख मिळतात. १ वर वर पहाता ऋग्वेदात इतर देवतांच्या मानाने विष्णूशी संबधीत सूक्तांची संख्या फारच थोडी असली तरी त्यातील वर्णन मात्र अत्यंत उदात्त व भव्य स्वरूपाचे दिसते.

**उदा.** *ज्याची वाणी मधुर रसांनी भरलेली तीन पावले अक्षय अन्नाने लोकांना आनंदित करतात . आणि जो एकटा त्रिविभागात्मक पृथ्वीला , द्युतलोकाला आणि जगाला धारण करतो . ऋग्वेद १.१५४.४२*

**उदा.** *विष्णूचे जे अंत्यंत श्रेष्ठ पाऊल विद्वान लोक सर्वदा पाहतात. आकाशात उघडलेला तो जणू तिसरा डोळा . ऋ. १.२२.२० ३*

**उदा.** *हे विष्णो, पुढे जन्मणा-या किंवा पूर्वी जन्मलेल्या कोणीही हे देवा तुझ्या महिम्याचा अंत गाठला नाही. सर्वोच्च आणि विस्तीर्ण आकाश . तू वर उचलून स्थिर केलेस आणि पृथ्वीची दिशा निश्चीत केलीस. ऋ ७.९९.३ ४*

ऋग्वेदाच्या कोणत्याही सुक्तात मूर्तिविज्ञानाच्या दृष्टिने विष्णूचे स्वरुप वर्णन मिळत नाही ; परन्तु विष्णू भक्तीचे मूळ तेथे सापडते . ते म्हणजे विष्णूंच्या प्रभावाने प्रेरित होऊन विष्णूभक्ती केल्यास तो भक्तांचे रक्षण करतो ;ही कल्पना वैदिक काळात रूढ झाली होती .

विष्णुपूजेच्या विकसीत स्वरूपाचे दर्शन महाभारतात व अनेक पुराणग्रंथात होते . विष्णू हा देवाधीदेव आहे ,तो भक्तांच्या हाकेला धावून जातो ;हा देव सात्विक प्रवृत्तीचा असून लोकांचे कल्याण करणारा आहे . महाभारतात पुराणात त्रिमूर्तीपैकी हा दुसरा देव कल्पून त्याच्यावर सत्वगुणाचा आरोप केला आहे ,

विष्णू ही एक वैदिक तसेच पौराणिकही देवता आहे .

विष्णू शब्दाची उत्पत्ती अनेक प्रकारे सांगितली जाते .

**विष** - सतत क्रियाशील असणे .

विष -व्यापणे . याधातूवरूनही तो शब्द सिध्द होतो.५ त्याला अनुसरून विष्णू म्हणजे व्यापक किंवा व्यापनशील असा अर्थ सांगितला आहे .

वरील दोन्ही उत्पत्ती बाजूला ठेऊन डॉ. रा. ना . दांडेकर हे य्या शब्दाची वेगळीच व्युत्पत्ती सांगतात.

**वि** - (उडणे ) या धातूला स्नु हा प्रत्यय लावून विष्णू हा शब्द तयार झाला आहे. ६

ऋग्वेदात विष्णूला येण्यास अत्यल्प अवसर मिळाला असला तरी त्यावरून वेदातील विष्णू गौण किंवा उपेक्षणीय होता असे समजण्याचे कारण नाही . यजुर्वेदाच्या काळात हळूहळू विष्णूचा लौकीक वाढू लागला . ब्राम्हण काळात या प्रक्रियेने अधिक जोर धरला . ब्राम्हणकाळ हा यज्ञ संस्थेच्या भरभराटीचा काळ . या काळात विष्णूने लोकप्रियतेच्या बाबतीत बरेच मजल मारली. ब्राम्हणांनी यज्ञो वै विष्णुः = यज्ञ म्हणजे विष्णू किंवा विष्णू म्हणजेच यज्ञ असे समीकरण ठरविले उपनिषदकाळात विष्णू तत्वज्ञाच्या क्षेत्रात प्रविष्ट झाला . मैत्री उपनिषदात म्हटले आहे की, समस्त सृष्टीचे धारण पोषण करणारे अन्नरूपी परब्रम्ह म्हणजे विष्णू होय . गृह्य सूत्रांच्या काळात

विष्णू हा नित्य पूजेचा देव बनला . महाभारतात विष्णूचे महात्म्य याहून अधिक वाढले . विष्णू समस्त सृष्टीचा शास्ता ठरला. परमेश्वर हि उपाधी त्या ब्रम्हदेवाच्या मुखाने दिली.७

ज्ञानेश्वरांनीही विष्णूची महती सांगितली आहे .

**कृष्ण विष्णू हरि गोविंद । या नामाचे निखळ प्रबंध ।।**

**माझी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ।।ज्ञा .९ .२ १० ८**

**विष्णू मूर्ती -**

प्रतिमाशास्त्राच्या क्षेत्राचा विचार केला तर भारतीय कलेत कुषाण काळच्या पूर्वी उत्तर भारतात हा काळ साधारण इ. स. पहिल्या शतकापासून तिस-या शतकाच्या दरम्यानचा काळ . या काळात मथुरा व तिच्या आसपास विष्णूमूर्ती घडविल्या जाऊ लागल्या . कुषाणा काळापूर्वीच्या विष्णूप्रतिमा आस्तित्वात नाहीत असे म्हटले तरी तिच्या निर्मितीची मुळे ब-याच मागच्या काळात कोठेतरी खोलवर रुजलेली असावीत, असे म्हणावे लागेल. कारण जरी प्रत्यक्ष प्रतिमा अस्तित्वात नसली तरी आपणा पुर्वीच्या नाण्यांवर ब-याच वेळा विष्णूचे दर्शन घडते. पांचालशासक विष्णूमित्र इ.स. पूर्व पहिले शतक , याच्या नाण्यावर विष्णू आहे. पुढे कुषाणकालीन हुविष्क यांच्या नाण्यावर विष्णू आहे ९. पण हे सर्वमान्य नाही. कारण बारीक नाण्यांवर विष्णूबरोबर त्याच्या आयुधांचा खोलवर अभ्यास करणे शक्य नाही. १०

कुशाणकालीन प्राचीन विष्णूचे एक सर्व सामान्य सोपे रूप ठरविलेले आहे . या विष्णूप्रतिमा आकाराने लहान आहेत . त्यामुळे त्या इकडून तिकडे हलविण्यास सोप्या आहेत, हा एक मुद्दा झाला . शुंग काळात यक्ष , यक्षिणी यांच्या मूर्तींना सर्वांगी बहर आलेला होता. याचीच छाप कुषाणकालीन मुर्तीवर पडलेली दिसते . या काळातील विष्णू प्रतिमेची घडण यक्षप्रतिमेवर आधारलेली आहे११. यक्षाच्या प्रतिमा लोकप्रिय झालेल्या होत्याच . त्याच स्वरूपात विष्णूप्रतिमा घडू लागली . अभय मुद्रेत उचललेला उजवा हात , उर्णाचिन्ह समभंग स्थितीत ताठ उभे रहाणाची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पद्धत, काष्टा घालून पुढे सोगा सोडलेले नेसुचे धोतर, व मोजके दागिने ही यक्षप्रतिमांची असलेली वैशिष्टे कुषाण कालीन मूर्तीत दिसतात. काही अपवाद सोडले तर सर्व प्रतिमा चतुर्भूज आहेत. त्यात प्रदक्षिणा क्रमाने गदा , चक्र , शंख किंवा काही मोजक्या ठिकाणी जलपात्र अशा प्रकारे आयुधे आढळून येतात. उजवा हात अभय मुद्रेत असणे, हे देवत्वाचे द्योतक समजले जाते . त्यामुळे या हातात कोणतेही आयुध देत नाहीत. विष्णूच्या वर उचललेल्या हातास उद्यत पाणि असे संबोधन आहे. १२

कुषाणकाळात प्रामुख्याने आढळणारी एक गोष्ट म्हणजे मूर्तीची उभयवर्ती घडण . दर्शनी भागाप्रमाणेच कुषाण शिल्पामध्ये पाठीमागच्या भागालाही तितकेच महत्व आहे . पाठीचा भागही लक्ष देण्यासारखा असतो . मुर्तिशास्त्रानुसार मूर्तिच्या या प्रकाराला चित्र असा पारीभाषिक शब्द आहे. येथे पाठीचे सुंदर अंकन केलेले असते. पाठीवर रूळणारा केशसंभार , अथवा फळाफुलांनी बहरलेला एक वृक्ष दिसतो. परंतु विष्णुशिल्पात बहुतेक देवाची पाठ दिसते . विष्णू प्रतिमांची हाताची घडणसुद्धा विचार करण्यासारखी असते. कारण सामान्यापेक्षा वेगळेपण म्हणजे विष्णूप्रतिमा चतुर्भूज असतात हे वर पाहिलेच . या जास्त असलेल्या हातांची घडण ही विशिष्ट पद्धतीची असते . आणि विचार करण्यासारखी असते. काही अपवाद वगळता कुषाणकालीन मूर्तींमध्ये हे हात वर उचललेले असतत. या हाताच्या स्थितीस म्हणजे प्रकारास "उदबाहू " असे म्हणतात. १३

कुषाणानंतर गुप्तांची राजवट सुरू झाली . या काळात निरनिराळ्या शास्त्रांचा विकास झाला. मूर्तिशास्त्रही त्याला अपवाद नव्हते. या शास्त्राची मूहूर्तमेढ कुषाणकालातच रोवली गेली होती. पुराणग्रंथांच्या संकलनातही मूर्तिनिर्माणाची बरीचशी माहिती संकलित झालेली होती. त्यामुळे मूर्तिविज्ञानाचा पुढचाटप्पा गाठवयाचा प्रयत्न सुरु झाला . कलाकारांनाही आश्रयदाते मिळाले . त्यामुळे काम जोरात सुरू झाले. मूर्ती बनविण्यास शरीर सौंदयाला वरचादर्जा मिळाला. अंगावर मोजके दागिने , अलंकृत असे प्रभामंडळ , नाजुक कोरीवकाम , सुरकुत्या पडलेली अंगावरील

अंगावरील तलम वस्त्रे , हसरे भरीव चेहरे, निरनिराळ्या प्रकारची केशरचना आणि या सर्वांबरोबर परिवार देवतांचा उगम अशी परिवर्तने दिसू लागली.

देशाप्रमाणे काळानेही मूर्तिविज्ञानाला चांगलेच प्रभावित केले. काळाच्या भेदाने देवतांच्या लोकप्रियतेत देखिल चढउतार होत असतात . तसेच मूर्तिनिर्माणातही परिवर्तने दिसतात. कुषाण कालीन मूर्तीत हातांचा उल्लेख उद्बाहू असा केला होता. कुषाण काळात मागील हात उद्बाहू असतात व सामान्य हात अनुक्रमे अभयमुद्रा व कटीवलंबी असतात. गुप्तकाळात हे मागचे हात खाली आले . व दोन्ही सामान्य हात अनुक्रमे दंडाशी काटकोन करीत स्थिर झाले. या हातांच्या अवस्थेला प्रलंबबाहू या नावाने ओळखले जाऊ लागले.४ खाली आलेल्या या हातांत आयुधे तरी असतात किंवा आयुधपुरूषांच्या मस्तकावर ठेवलेले असतात.

**आयुध पुरुष -** वैष्णव शिल्पात आयुधांचे मानवी करण झाले . ही प्रथा मध्य काळापासून सुरू झाली ,म्हणत असले तरी हेआयुध पुरूष गुप्त काळात दिसतात .शंख ,चक्र ,गदा ,पद्म यांच्या मानवी मूर्ती शिल्पात कोरल्या जाऊ लागल्या .

दैवी शक्तीचे तेज दाखविण्यासाठी मस्तकाभोवती जे वर्तुळ दाखविले जाते त्याला मूर्तीकलेच्या पारिभाषिक शब्दांमध्ये 'प्रभामंडळ 'असे म्हणतात.५ खरे तर कुषाणकाळापासूनच या वैशिष्ट्याचा उगम झालेला होता. परंतु ते इतर देवतांच्या शिराभोवती होते. विष्णूप्रतिमेत त्याचा शिरकाव झालेला नव्हता. परंतु गुप्तकाळामध्ये प्रभामंडळाची प्रभा दिसून येते. कधी हे प्रभामंडळ साधे दिसते तर कधी मणिमाला ,पत्रावली , हारयष्टी , मकरकमल अशा अलंकारांनी नटलेले दिसते.

कुषाणकाळात प्रतिमा उभयवर्ती असत हे मागे पाहिले आहे. पण हे उभयान्मुख अंकन गुप्तकाळात फारसे टिकले नाही . मुर्ती रेखीव बनू लागल्या. मूर्ती सुंदर कशा बनतील ? आकर्षक्र डौलदार कशा घडवाव्यात, यासाठी कलाकाराने आपले सर्व कसब पणास लावण्यास सुरुवात केली. परंतु याच वेळेस एक गोष्ट घडत होती . कुषाण कालीन प्रतिमेचा 'चित्र ' हा प्रकार बदलला जात होता. कारण कलाकार दर्शनी भागातच गुंतत गेला आणि त्याने पृष्ठभागावरचे लक्ष कमी केले . तो मागचा भाग पुसटशी कल्पना यावा एवढाच घडवू लागला. मागील बाजूस फक्त प्रभामंडळाचे

वाटोळेपण ,दंडाची ठेवण व वस्त्राचे संकेतच शिल्लक राहिले. दर्शनी भागावरचे लक्ष वाढले . त्यामुळे प्रतिमेचे दागिने अगदी मोजके व रेखीव दिसू लागले . या काळात म्हणजे कुशाण व गुप्त काळात गदा व चक्र विष्णूचि आवश्यक आयुधे होती. तिसरे आयुध श्मख किंवा जलपात्र ,उजवा हात अभय मुद्रेत असल्याने तेथे कोणतेच आयुध नसायचे गुप्तकाळामध्येही हातही खाली आला तो एखादे फळ किंवा हार घेउनच या काळात कमळाचा मात्र अभावच असे . रामायण, महाभारत ग्रंथात विष्णूचा उल्लेख ' शंख, चक्र, गदाधर ' असाच आहे. विष्णूच्या आयुधात कमळाचे आस्तित्व गुप्त काळापर्यंत अजिबात दिसत नाही. [६]

या ऐवजी उजवा हात अभयमुद्रेत दिसतो . पुढे काही काळ विष्णूच्या हातात फळ किंवा जपमाळ दिसते , व कालांतराने कमलदर्शन घडते . मध्यकाळात शंख ,चक्र ,गदा ,पद्म यांच्या स्थान परिवर्तनाच्या आधारावर चोवीस प्रकारच्या मूर्ती घडविल्या जाऊ लागल्या . विष्णू या देवतेची अनेक रूपे मानली गेली आहेत . विष्णू - सहस्त्रनाम या एका शब्दावरूनच विष्णूची सहस्त्र रूपे आहेत हे स्पष्ट होते .तथापी सहस्त्रनामातील चोवीस नावांचाच उल्लेख अग्रक्रमाने करून पूजेच्या वेळी त्यांना नमस्कार केला जातो .

विष्णूची अवतार कल्पना देखील कालानुरुप प्रभावीत झाली . अवतारांच्या संख्येविषयी एकमत नाही . प्रत्येक पुराणात अवतारसंख्या वेगवेगळ्या आहेत ,पण पुढे हळूहळू यथावकाश मुख्य अशा दहा अवतारांना मान्यता मिळाली दहा अवतारांची आपण नंतर पुढे सविस्तर चर्चा करणार आहोत .

***विष्णू शिल्पाचे वर्गीकरण -------------***

विष्णूशिल्पाचे अभ्यासाच्या सूक्ष्म दृष्टीने वर्गीकरण केले तर ते सोईचे होते .

वैष्णव ध्रुवबेर - अचल मूर्ती

| स्थानक | आसन | शयन |
|---|---|---|
| उभी | बसलेली | निजलेली |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

■ **स्थानक मूर्ती -**

इतर दोन्ही प्रकारापेक्षा उभ्या अर्थात स्थानक मूर्तींची संख्या जास्त असते . या मूर्तीमध्ये द्विभूज , चतुर्भूज , अष्ट्भूज असेही प्रकार असतात .

द्विभूज स्थानक मूर्ती -अशा मूर्तींची संख्याही कमीच असते . अशाप्रकारच्या मूर्ती कुषाण काळात घडत असत .

**चतुर्भूज स्थानक मूर्ती -** खूप खोल तपशिलात न शिरल्यास या वर्गातील प्रतिमा साधारण एकसारख्याच असतात . एवढेच की कुषाण कालीन मूर्ती उद्बाहू आहेत . परन्तु गुप्तकाळामध्ये या प्रतिमा प्रलम्बबाहू होतात . गदा ,शंख ,चक्र या आयुधांची स्थाने बहूतेक निश्चितच असतात मूर्तीत कधी आयुधपुरुष दिसतात ,परन्तु परिवार देवतांची गर्दी दिसत नाही . अर्थात दागिने , वस्त्रे यांच्यात किंचितसे बदल दिसतात .

**अष्टभूज स्थानक मूर्ती -** कुषाण काळात अष्टभूज विष्णू प्रतिमा ज्ञात होत्या अष्टभूज विष्णूपूजन इ. सनाच्या सुरवातीस दक्षिणेत रूढ होते .

- **आसन मूर्ती -** स्थानक मूर्तीपेक्षा आसन मूर्तींची संख्या कमीच दिसते ,कुषाण काळातच गरूडावर बसलेल्या दुर्मिळप्रतिमा मिळतात .
- **शयन मूर्ती -** शयन मूर्ती अर्थात शेषशायी विष्णू ,शेषनागावर झोपलेल्या विष्णूला शेषशायी नावाने ओळखतात . अशा प्रकारची प्रतिमा कुषाण काळात दिसत नाही, परन्तु गुप्त कळात मात्र ती दिसते .
- **यानक मूर्ती -** वाहनावर स्वार असलेली मूर्ती

माणूस सामान्यतः वरील तीन अवस्थामध्ये असतो. त्यावरून हे मूर्तीभेद कल्पिलेले आहेत. हे मूर्तीभेद प्रामुख्याने वैष्णव मूर्तीतच असतात . मंत्रशास्त्रात याचे आणखी एक वर्गीकरण केले आहे .

- **योगमूर्ती -** उपासना ,अध्यात्मसिध्दी अध्यात्मिक उपासनेकरीता ही मूर्ती नदीकिनारी ,पर्वत शिखरावर , गावाबाहेर स्थापन करतात .
- **भोगमूर्ती -** ऐहिक अभ्यूदय ,प्रपंचात सुख संपन्नता हवी असेल तर या मूर्तीची पूजा अभिप्रेत असते.

- **वीर मूर्ती -** राजे लोकांना युद्ध विजयार्थ , विष्णूचे पराक्रमी सामर्थ्यशाली रूप .
- **अभिचारक मूर्ती -** अभिचार कामासाठी , अशा अशा मूर्ती गावात स्थापू नयेत. त्या पर्वत अरण्य किंवा निर्जन प्रदेशात स्थापाव्यात . स्वतःचे सामर्थ्य वाढवून शत्रूला पराभूत करण्यासाठी या मूर्तींची स्थापना व पूजा होते .

वरील सर्व प्रकारात स्थानक, आसन, शयन, यानक असे उपप्रकार असतात.

***विष्णू मूर्तींचे प्रकार ------------***

- साधारण मूर्ती
- अवतार मूर्ती
- असाधारण मूर्ती

**साधारण मूर्ती------**

विष्णू मूर्तींचे साधारण रूप म्हणजे निजमूर्ती .या मूर्तींचे अंकन पाहिले तर ही मूर्ती चतुर्भूज असते चार हातात शंख ,चक्र ,गदा ,पद्म ही आयुधेअसतात .हृदयावर कौस्तुभ व श्रीवत्सचिन्ह आणि गळ्यात गुडघ्यापर्यंत लोंबणारी वैजयंतीमाला असे विष्णूचे साधारण रूप असते .

अवतार मूर्तीत श्री विष्णूचे दहा अवतार व इतर काहीअवतार येतात .

असाधारण मूर्तीत शेषशायी, हरीहर ,वैकुंठ इ .प्रकार येतात .

विष्णू मूर्ती अंकनात विष्णूच्या अलंकरणाना ,आयुधांना विशेष महत्व आहे.

शंख,चक्र ,गदा ,पद्म ,धनुष्य ही आयुधे व श्रीवत्स ,कौस्तुभ ,वैजयंतीमाला ,किरीट ,कुंडल ही अलंकरणे आहेत . वैष्णव संप्रदायात या प्रत्येकाचा तात्विक अर्थ सांगितला आहे .

- **शंख -** पंचमहाभूतात्मक शब्दब्रम्हाचे प्रतीक . नाव - पांचजन्य
- **चक्र -** मनाचे प्रतीक . नाव - सुदर्शन
- **गदा -** आदिविद्या . नाव - कौमोदकी
- **पद्म -** सृष्टीचे प्रतीक .
- **धनुष्य -** आदीमायेचे प्रतीक , नाव शारङग
- **श्रीवत्स -** तेजाचे प्रतीक , कौस्तुभमणीयुक्त .कुंदपुष्पाच्या वर्णाचे

- **वैजयंती -** आद्या,अजया शक्ती.कूटस्थ सत्व . पंचवर्णाची.
- **कुंडले -** क्षर आणि अक्षर तत्वाची प्रतिके.
- **गरूड -** कमलवर्ण .
- **गदा -** कृष्णवर्ण
- **पुष्टी -** शिरिष पुष्पासारखी (एक भार्या )
- **लक्ष्मी -** सुवर्णवर्णाची
- **कौस्तुभ -** लाल रंगाचा
- **चक्र -** सहस्त्र सूर्याच्या वर्णाचे
- **अनंतनाग -** मेघवर्णाचा

***अवतार मूर्ती --***

अवतार या शब्दाचा अर्थ पाणिनीच्या सूत्रानुसार स्पष्ट होतो तो म्हणजे उच्च स्थानावरून खाली उतरणे. पुराणे व इतर ग्रंथांतुन प्रतिपादन केलेले अवतार तत्व हे मध्ययुगीन व अर्वाचीन हिंदूधर्माचे एक प्रमुख अंग आहे असे मानावे लागेल . परमात्मा हा आपले वैकुंठधाम सोडून धर्मकार्यासाठी जेव्हा एखाद्या प्राण्याचे अथवा माणसाचे शरीर धारण करुन काही काळ किंवा संपूर्ण जीवनभर त्या शरिरात वास्तव्य करतो , तेव्हा त्या शरीर धारणेला अवतार असे म्हणतात .७ मात्र हा ईश्वराचा जन्म परवशतेने न होता स्वेच्छेने आणि प्रकृतीवर पूर्ण ताबा ठेऊन होत असतो. त्यामुळे तो जरी अवतारी पुरूष असला तरी मनुष्य रूपात अवतार घेतल्यावर त्य मानवरूपाला इहलोकीच्या दुःखांना सामोरे जावे लागते. उदा. रामाला तो देवता असूनही संसारातील भोग भोगावे लागले. वनवास भोगावा लागला .

अवतार म्हणजे मूळ रूपात परिवर्तन होय . आपल्या मुळ रूपाचा त्याग करुन स्वतःच्या कर्मासाठी नवीन रूप धारण करणे म्हणजेच नवा जन्म ग्रहण करणे. पुराणात किंवा इतिहासात अवतार कल्पनांचा विकास चार प्रकारांनी केला जातो .

१.परमेश्वर आपल्या दिव्य मूर्तीचा त्याग करून नविन जन्म धारण करतो.

२. परमेश्वराचा काही अंश पृथ्वीवर अवतीर्ण होतो.

३. अवतार हा परमेश्वराच्या काही अंशाचा प्रभाव असतो.

४. चौथा विशेष गुण म्हणजे भगवानमूर्तिचे विभाजन चार रूपात होते.

निर्गुण मूर्ती वासुदेव, सगुण मूर्ती संकर्षण , प्रद्युम्न आणि अनिरुद्ध.

**यदा यदाहि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत ।**

**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मान सृजाम्यहम ।।**

**परित्राणायम साधुनां विनाशाय च दुष्कृताम ।**

**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।८**

पृथ्वीवर वेळोवेळी उत्पन्न झालेल्या अवांच्छनीय तत्वांचा संहार करुन धर्मसंस्थापनेचे कार्य करण्याकरिता महाविष्णू निरनिराळे अवतार घेतो , असा सिद्धांत भगवद्गीतेत स्पष्टपणे मांडला आहे. पणा त्यापुर्वी अवतारवाद आस्तित्वात नव्हता ,असे म्हणता येणार नाही. साधारणपणे असे प्रतिपादन करण्यात येते की, अवतार कल्पना गुप्तकाळात रूढ झाली . पण हा सिद्धांत निर्विवाद नाही. कारण अवतार नावांनी प्रसिद्ध असलेल्या वराह , संकर्षण आदि देवता गुप्तकाळापूर्वीपासून आस्तित्वात आहेत. परंतु वैष्णव अवताराच्या या साखळीत त्यांना नंतर स्थान मिळाले. जेव्हा जेव्हा पृथ्वीवर अधर्म माजतो ,धर्माचा -हास होतो , दुर्जन बलदंड होतात आणि सज्जनांचा छळ होतो, त्या त्या वेळी भगवान विष्णू अवतार धारण करून भूभार हलका करतात . व धर्माची घडी पुन्हा स्थापन करतात. अशी वैष्णव पुराणाकारांची धारणा आहे.

भारतीय परंपरेनुसार विष्णूच्या सगळ्याच अवतारांना समान स्थान प्राप्त झाले आहे , असे नाही . त्यातील काही पूर्ण अवतार मानतात. विष्णूच्या अवतारसंख्येबद्दल वाद आहेत . प्रत्येक पुराणातील अवतार नावे ,संख्या वेगवेगळी दाखविली आहे सर्वमान्य असे दहा अवतार गृहित धरले आहेत.

वराह, वामन , परशुराम प्रथम प्रकारचे, नृसिंहादि दुस-या प्रकारचे, राम, कृष्ण तिस-या प्रकारचे अवतर आहेत. मत्स्य, कूर्म यांचे स्थान नगण्य नगण्य आहे. बुद्ध व कल्की यांना पूजनीयतेच्या दृष्टीने स्वतंत्र स्थान नाही. बाकीच्यांची देशकालपरत्वे स्वतंत्र पूजा होत असते. पण त्यात राम कृष्णाचे स्थान उच्च असते .

विष्णू अवतारांची संख्या दहा लोकप्रिय असली तरी ती सर्वानुमते ग्राह्य नव्हती . तरी ----

दोन जलचर - मत्स्य, कूर्म .

दोन वनचर - वराह , नरसिंह .

दोन ब्राम्हण - वामन, परशुराम.

दोन क्षत्रिय - राम, कृष्ण ,

बुद्ध व पुढे होणारा कल्की

अशी अवतारांची विभागणी आढळते.

विष्णूच्या अवतार मूर्ती कुषाण काळापासूनच आढळू लागतात. या दहा अवतारातील मत्स्य,कूर्म व कल्की यांची स्वतंत्र मंदिरे गुप्तकाळापर्यंत तरी असावित असे वाटत नाही. बुद्धाची मूर्ती कुषाण काळात घडविली गेली पण ते फक्त बौद्ध धर्माचे अंग म्हणून , ब्राम्हण धर्मात नव्हे. पुढे कधीतरी बुद्धाला ब्राम्हण मूर्तिशास्त्रात स्थान मिळाले . परंतु त्याबरोबरच स्मृतींनी त्याच्या पूजनाला निषेधाज्ञा लावून ठेवली आहे.९ मुरलीधर कृष्ण, कोदंडधारी राम गुप्तकाळापर्यंत दिसतच नाहीत.

पुराणंनी दहा ही अवतारांची संख्या निश्चित केली आणि त्याची महात्मे सांगितली. दहा अवतारांचा प्रसिद्ध श्लोक असा -------

**मत्स्य कूर्मो वराहच नारसिंहोऽथ वामनः ।**

**रामो रामश्च कृष्णश्च बौद्धः कल्कीति दश ।।**

मत्स्य , कूर्म , वराह , नरसिंह , वामन , परशुराम , राम , कृष्ण , बुद्ध आणि कलकी हे दशावतार आहेत. या दशावताराचे नामोल्लेख इ.स. पूर्व हजारो वर्षापासून मिळतात . परंतु सख्येच्या नियमनानुसार गुप्तकाळाच्या आसपास प्रारंभ होतो असेही म्हणता येत नाही. कारण विष्णूच्या अवतारमूर्ती कुषाणकालात दिसू लागल्या होत्या . जयदेवांनी ' गीतगोविंद ' च्या पहिल्या सर्गात दशावतारांची स्तुती केली आहे. नेमेंद्रांनी ' दशावतार चरित ' या महाकाव्यात अवतारांचे विस्तृत वर्णन केले आहे. वैदिक किंवा पौराणिक दृष्टीकोनातून पाहिले तर दहा अवतारांचे असे विभाजन करावे लागेल. ---

- सत्य युग - मत्स्य , कूर्म ,वराह , नरसिंह .

- त्रेता युग - वामन , परशुराम , दाशरथी राम .
- द्वापार युग - कृष्ण किंवा बलराम .
- कलीयुग - बुद्ध , कल्की .

देवतेने मनुष्य रूप धारण करणे किंवा अन्य रूपात मानवाप्रमाणे कार्य करणे याच्या ब-याच कथा सापड्तात . शेवटी मत्स्य, कासव , वराह, नरसिंह , वामन , परशुराम , राम , कृष्ण, बलराम , बुद्ध , कल्की असा अवतार क्रम ठरतो . या अवतारक्रमातही वैज्ञानिक रहस्य दडलेले आहे. धर्मकल्पनेत हे सर्वमान्य आहे की भगवान कोणत्या विशिष्ट योनीत नसतात . तर लहान योनीतून मोठ्या योनीत प्रविष्ट होतात . या क्रमातील नैसर्गिक रहस्य असे कि सृष्टीचा विकास क्रम लघुकाय जीवापासून सुरू होतो . तर दीर्घकाय प्राण्यांमध्ये समाप्त होतो. सृष्टीची रचना पाण्यापासून सुरू झाली त्याचे प्रतीक मासा आहे. नंतर उभयचर असे पाणी व जमीनीवर रहाणारे जीव विकसित झाले. त्याचे प्रतीक म्हाणजे कूर्म/कासव हे आहे . नंतर विकसित झालेल्या केवळ जमिनीवर रहाणा-या चतुष्पाद प्राण्याचे प्रतीक म्हणजे वराह हे आहे. नंतर प्राणि व मनुष्य याचे मिश्रण म्हणजे नरसिंह. त्यानंतरच्या लघुकाय माणसाचा प्रतिनिधी म्हणजे वामन . आदि.

***मत्स्य*** - मत्स्य म्हणजे भगवान विष्णूंनी माशाच्या रूपात अवतार. वैदिक वाङ्मयात मत्स्य हे प्रजापतिचे स्वरूप होते आणि सृष्टीच्या विकासासाठी प्रजापतिने ते धारण केले होते , असे म्हणतात. पौराणिक संदर्भ घेतला तर हरीने दुष्टांचा संहार करण्यासाठी व संत पुरुषाचे रक्षण करण्यासाठी हा अवतार घेतला होता.

हयग्रीव किंवा शंखासुर नावाचा असुर फारच माजला होता . त्याने ब्रम्हदेवाकडचे चारही वेद चोरले होते आणि वेदांसह तो समुद्रात गडप झाला . हे चोरलेले वेद परत मिळवावयास हवे होते. आणि ते वेद परत मिळविण्यासाठी विष्णूंना मत्स्यावतार घ्यावा लागला. मनु भक्ती व मुक्तीसाठी तपश्चर्या करीत होते . ते ओंजळीत पाणी घेऊन अर्घ्य देत असताना त्यांच्या ओंजळीत मत्स्य प्रकट झाला . मनुंनी तो कमंडलूमध्ये ठेवला . पण त्याचा आकार वाढत होता . हा प्रत्यक्ष हरीच आहे हे मनुने ओळखले. व त्यानी सांगितल्याप्रमाणे केले . विष्णूंनी प्रलयातून हयग्रीव /शंखासुर या दानवाचा नाश करुन वेद वाचविले . ते पाण्यातुन वर आणले आणि ब्रम्हदेवाला दिले.

या अवताराचे अंकन साध्या माशाच्या रूपाने किंवा पाठीवर चार मानवमूर्ती किंवा मानवमस्तके असलेल्या माशाच्या रूपात करतात . चार मानव म्हणजे चार वेदांचे प्रतीक होय . क्वचित माशाच्या पाठीवर शिवलिंगही असते .१० मत्स्यावताराच्या स्वतंत्र प्रतिमा देखिल असतात.

१.केवळ मत्स्यरूप प्रतिमा .

२. खालचे अंग मनुष्यरुपात व वरचा भाग चतुर्भूज विष्णूच्या रूपात असतो .

३. पद्मासनातील विष्णूच्या पाठशिळेवर मासा .

४. कमललतेवर पाठीवर चार मानवमुखे धारण केलेला मासा .

***कूर्म -***

कूर्म म्हणजे भगवान विष्णूनी कासवाच्या रुपात घेतलेला अवतार . या अवताराचा उगम अरण्यकात आढळतो . प्रजापतीचा शरीररस कूर्मरूपाने जलात फिरत होता . तोच पुढे सहस्त्रशीर्षपुरूष स्वरूपात प्रजापतीपुढे प्रगत झाला . प्रजापतीने त्याला विश्वनिर्मितिचा आदेश दिला . भागवत पुराणाने कूर्म अवताराचा जन्म समुद्रमंथन कथेशी जोडला आहे. देव दानवांच्या युद्धात दैत्यांचा पराभव झाला . पण देव संपत्तीहीन झाले . श्री विष्णूंच्या सांगण्यावरून क्षीरसागराचे मंथन करण्यास तयार झाले . मंदार पर्वताची रवी व वासुकीची दोरी केली. परंतु थोड्याच वेळाने हा मेरू पर्वत खाली बुडू लागला . तेव्हा बुडणा-या पर्वताला आधार देण्यासाठी विष्णूंना कूर्मावतार घ्यावा लागला . व त्यानी मेरु पर्वताला टेकू दिला . व कूर्मरूप विष्णूनी ही मंदाराचलाची रवी आपल्या पाठीवर तोलून धरली .

कूर्म अवताराच्या स्वतंत्र प्रतिमा आढळत नाहीत . समुद्रमंथनाचे दृष्य , कासवाच्या पाठीवर वासुकी ने वेढलेला मंदराचल , बाजूला देव , दानव म्हणून दोन पुरूष . क्वचित कासवाच्या पाठीवर मंदराचल ,समोर पृथ्वी दिसते.

***वराह -***

वराह हा भगवान विष्णूंनी घेतलेला तिसरा अवतार . वैदिक वाङ्मयात हेही प्रजापतीचे रूप आहे . पृथ्वी उत्पन्न होण्यापूर्वी प्रजापती वायूचे रूप घेऊन अंतरिक्षात हिंदत होते. त्यावेळी त्यांना दिसले की समुद्राच्या अथांग जलाशयात पृथ्वी बुडालेली आहे . पुराणात अशी कथा सांगतात की हिरण्याक्ष नावाचा असुराने पृथ्वीचे हरण केले व तो तिला पाताळात घेऊन गेला . मग पृथ्वीला पाताळातून वर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आणण्यासाठी भगवान विष्णूंनी वराहरुपाने अवतार घेतला .११ हिरण्याक्षाचा वध केला . आपल्या तीक्ष्ण सुळ्यावर उचलून पृथ्वीला वर घेउन आले . नंतर तिची स्थापना शेषनागाच्या फण्यात्र केली.

वराह अवताराच्या मूर्तीचे काही प्रकार पाडलेले आहेत.

***नृवराह -*** यालाच आदिवराह असेही म्हणतात . अग्निपुराणात याचा उल्लेख भूवराह असाही केला आहे . या मूर्तीत फक्त तोंड वराहाचे असते व बाकीचे शरीर मानवाचे असते. हा वराह आलीढ मुद्रेत असतो . मत्स्य पुराणात याला महावराह असेहि म्हटले आहे . नृवराह प्रतिमेत विष्णूभार्या लक्ष्मीचा अभाव दिसतो . या प्रकारच्या मूर्ती ब-याच ठिकाणी दिसतात . विदीशेजवळ उदयगिरीवर अशी विशाल मूर्ती आहे . डाव्या पायाखाली शेषनाग आहे . ऐहोळे येथेही अशी मूर्ति आहे. तिच्या सुळ्यांवर स्त्रीरुप पृथ्वी आहे.

***यज्ञवराह -*** या वराहमुर्तीत तो मूळ रूपात असतो . म्हणजे संपूर्ण पशुरूपात दाखवितात संपूर्ण शरीर यज्ञमय आहे हे सुचविलेले असते. उत्तरेत अशा मूर्ती आढळतात. ही मूर्ती सिंहासनावर बसलेली पण दाखवितात. एरण येथील मूर्तीवर पूर्ण देहावर कमंडलू घेतलेले ऋषी व इतर देव कोरलेले आहेत . गळ्यातील माळेवर राशी कोरलेल्या आहेत.

***प्रलयवराह -*** हा ललितासनात बसलेला दाखवितात. आणि याच्याजवळ फक्त भूदेवी दाखवितात. दक्षिणेतील वराहात सर्वात मोठा फरक म्हणजे पृथ्वीची स्थिती . वराह हे राष्ट्रकूटांचे राजचिन्ह होते . पृथ्वी ही ब-याच ठिकाणी डाव्या हातावर उभी दाखवितात . कधी कडेवर घेतल्याप्रमाणे तर कधी डाव्या भुजेवर बसल्याप्रमाणे याखेरीज लक्ष्मी अंकावर घेऊन हा वराह उभा असतो .

***नरसिंह -***

विष्णूचा परमभक्त प्रल्हाद याच्या रक्षणासाठी विष्णूंना हा नरसिंहाचा अवतार घ्यावा लागला . प्रल्हाद हा दैत्यकुळातील होता . परन्तु त्याची परमेश्वरभक्ती निस्सिम होती . त्याचे वडील हिरण्यकश्यपू हे दैत्यकुळातील . हिरण्यकश्यपूला वरदान होते की त्याला कोणताही मानव मारू शकणार नाही; किंवा कोणतेही जनावर मारू शकणार नाही . प्रल्हादालाही तो देवाचे नामस्मरण केल्यामुळे त्रास देई . प्रल्हादाने विष्णूचा धावा केला आणि अर्धा नर व अर्धा पशु अशा नरसिंह अवतारात विष्णू प्रकटले . खांब फोडून बाहेर आले व हिरण्यकश्यपूचा वध केला .

नरसिंहाच्या मूर्ती भारतात ब-याच ठिकाणी सापडतात . तो कधी अष्टभूज आहे तर कधी सहा भूजा आहेत. तो चतुर्भूज ही असतो . नरसिंह हे विष्णूचे उग्र रूप आहे . पण ब-याच ठिकाणी ते सौम्यच दाखवितात . नरसिंहाच्याही मानव परीमाण मूर्ती घडवित असत .

नरसिंहाच्या मूर्तीचे काही प्रकार कल्पिलेले आहेत .

***गिरीज नरसिंह*** - हा पर्वतातून प्रकट झालेला असतो. पर्वतातील सिंह बहुतेक एकटाच असतो , म्हणून त्याला केवल नरसिंह असेही म्हणतात .

***स्थौण नरसिंह*** - याला स्थाणू असेही म्हणतात . प्रल्हादाचे रक्षण करण्यासाठी खांबातून प्रकट झालेला जो नरसिंह आहे त्याला स्थाणू नरसिंह असे म्हणतात . याच्या चतुर्भूज प्रतिमा असतात . तो कधी हिरण्यकश्यपूशी युद्ध करताना दाखवितात . हिरण्यकश्यपूला मांडीवर घेऊन त्याचे पोट फाडणारी सिंहमुखी पण मानवदेहधारी अशा या मूर्तीला 'विदरण नरसिंह ' असे म्हणतात.

***लक्ष्मी नरसिंह*** - लक्ष्मीसह बसलेल्या नरसिंहाला लक्ष्मी नरसिंह म्हणतात. यात नरसिंहाच्या डाव्या मांडीवर लक्ष्मी बसलेली दाखवितात . अशा प्रतिमा उत्तरेत तसेच दक्षिणेतही आढळतात .

यानक नरसिंह - गरूडाच्या पाठीवर बसलेला यानक नरसिंह म्हणून ओळखतात.

योग नरसिंह - योग पट्ट बांधून बसलेला योग नरसिंह म्हणतात .

***वामन*** -

वामनाचे बटू,चतुर्भूज विष्णू , त्रिविक्रम या तीन रूपात अंकन आढ़ळते . बटू या स्वरूपाच्या स्वतंत्र

प्रतिमा आढ़ळत नाहीत . परन्तु त्रिविक्रम तो दिसतो . पाच तालमानात दिसतो . उंचीने बुटका , शरीराने पुष्ट असतो . पोट दोंदील असते . तसे पाहिले तर त्रिविक्रमाचे धागे दोरे ऋग्वेदापर्यंत पोहचतात . असे असले तरी प्रत्यक्ष प्रतिमा गुप्तकाळापूर्वी होती की नाही ते सांगता येणे कठीण आहे . गुप्तकाळात मात्र बटू वामन व त्रिविक्रम अशी दोन्ही रूपे दिसू लागली .

बळीला पाताळात पाठविण्यासाठी विष्णूचा वामन अवतार झाला . बळीच्या यज्ञात जाऊन त्याने त्रिपाद भूमी मागितली. बळीने ती दिल्यावर तीन पावलात त्रिभूवन व्यापले , व बळीला पाताळात पाठविले . वामन मूर्ती ही पंचताल असावी . द्विभूज , हातात छत्र व दंड मुखावर किशोर भाव आणि ब्रम्हचर्याचे प्रतीक खांद्यावर जानवे अशी बनवितात . दानोदक हातावर पडताच या

बटूने त्रिविक्रमाचे रूप धारण केले . एक पाय आकाशाकडे उचलून उभा असलेला त्रिविक्रम गुप्त काळापासून दिसतो . चार हाताचा ,आठ हाताचा अशा प्रतिमा दिसतात . चतुर्भूज त्रिविक्रम मथुरेत रूढ असावा ,कारण तिथे अशा प्रतिमा मिळालेल्या आहेत . त्रिविक्रमाचे आठ हात वाढत्या बळाचे प्रातिनिध्य करतात . त्रिविक्रमाच्या मागे कमलधारीणी लक्ष्मी असते . वर उचललेले पाऊल एका राक्षसी तोंडाला जाऊन भिडते . उजव्या पायाला जवळ जवळ मिठी मारलेला बळी असतो . आकाशातील सूर्य , चंद्र यांचे अंकन असते .

***परशुराम -***

दशावतारातील सहावा अवतार म्हणून परशुरामाची गणना होत असली तरी त्याच्या स्वतंत्र प्रतिमा नाहीत . काही खास वैशिष्ट्येही नाहीत . परशुराम धनुर्वेद आणि परशू चालविण्यात निष्णात होता . त्या काळी कार्तवीर्य सहस्त्रार्जून स्वतःच्या सहस्त्र बाहूंच्या बळामुळे फारच अहंकारी बनला होता . ज्यांनी प्रजेचे रक्षण करावयाचे तेच प्रजेची लूट करीत होते . कार्तवीर्य खरे तर मूळचा पूण्यशील तो अवधूताचा अत्यंत भक्त होता . त्याने परमेश्वराजवळ असे मागणे मागितले की मृत्यु यावा तर तो प्रत्यक्ष विष्णूंच्या हातून ,म्हणजेच अमरत्व मिळविले होते . आणि त्याचा अहंकार वाढत गेला . त्याने जमदग्नी ऋषींच्या आश्रमातील कामधेनू गाय पळविली . आणि परशुरामाच्या हातून कार्तवीर्याचा वध झाला.परशुरामाने कोकण या नवभूमीचे निर्माण केले आहे .१२ विष्णूधर्मोत्तर पुराणाच्या मते द्विभूज भार्गवरामाच्या हातात परशु असावयास हवा. चिपळूण जवळच्या परशुराम क्षेत्रात परशुरामाचे देवालय आहे, त्यात तो काल व काम यांच्या बरोबर दिसतो.

***राम -***

राम हा दशावतारातील सातवा अवतार मानतात . रावणादी राक्षस कुळाचा संहार करून धर्माची घडी बसविण्यासाठी रामाचा अवतार झाला . रामाला मूर्तीमंत धर्मच म्हटले आहे . रामाची मूर्ती घडवितांना तो एकटा असेल तर चतुर्भूज करावा . त्याच्या हातात धनुष्य-बाण ,शंख ,चक्र ही आयुधे असावित . तो स्थानक अवस्थेत असावा . राम एकटा उभा असतो तेव्हा तो धनुष्य- बाण धारण करतो . धनुषाला कोदंड म्हणतात . त्यावरून रामाला कोदंडधारी राम म्हणतात . पश्चिम कलेत राम व परशुराम आयुधावरून ओळखतात . दक्षिणेत या दाशरथी रामाच्या पाषाणापेक्षा

धातूमूर्तीच अधिक मिळाल्या आहेत . बहुतेक मूर्ती द्विभूज असून धनुष्यबाण घेतलेल्या आहेत , बरोबर लक्ष्मण,सीता व मारूती अंकीत करतात . दक्षिण भारतीय कलेत रामायण कथांची दृष्ये मंदिराच्या किंवा घराच्या भिंतीवर अंकीत करावयाची पध्दत होती . भासांच्या प्रतिमा नाटकात तिचे अस्तित्व पहावयास मिळते १३.

***कृष्ण -***

दशावतारातील आठवा अवतार म्हणून जरी कृष्णाला मानले जात असले तरी मध्य भारतीय कलेत बलरारामालाच आठवा अवतार मानतात. राम , कृष्ण हे भारतीय सस्कृंतीचे दोन मोठे आधारस्तंभ आहेत . एकाने रामायण घडविले आहे तर दुस-याने महाभारत . हे दोघेही ऐतिहासिक पुरूष पण पुढच्या काळात देव म्हाणून उपास्य ठरले आहेत. कृष्ण हा विष्णूचा सर्वात श्रेष्ठ म्हणजे पूर्णावतार म्हणून प्रसिद्ध आहे . जन्म मथुरेत ,बालक्रीडा गोकूळात, किशोरावस्थेत कंसाला मारले , महाभारताच्या काळात विष्णूला परमेश्वराचे स्थान प्राप्त झाले .वासुदेव व विष्णू हे दोघे एकच मानले जात होते . शांतीपर्वात युधिष्ठिर ,कृष्ण व विष्णू एकचआहेत असे सांगतो . श्रीकृष्णाचे प्रथम अंकन भारतीय राजा अगॅथोल्कियस याच्या ऐखनूम येथे ब्रांझच्या नाण्यावर दिसते. एका बाजूला श्रीकृष्ण व दुस-या बाजुवर बलराम मूर्ती आहे १४. कुषाण काळाच्या पूर्वी पासून कृष्णलीलेची दृष्ये दगडावर कोरली जात . कृष्णाची प्रतिमा म्हणजे रांगत्या बाळकृष्णाची किंवा तिरका पाय ठेवून देहूडाचरण वेणूवाजविणा-या मुरलीधराची अशी सांगड असते . मग ह्रा कृष्ण चतुर्भूज होता की द्विभूज ? कृष्णाचे मूळरूप चतुर्भूज होय . शंख ,चक्र घेतलेला . वासुदेव व देवकी यांच्या सांगण्यावरून कंस वधापर्यंत त्याने दोन हात गुप्त ठेवले होते . किशोर कृष्ण व प्रौढ कृष्ण या दोघानाही शिल्पकलेत स्थान मिळाले आहे . कुषाण ,गुप्तकाळातील ब-याच मूर्ती मिळालेल्या आहेत राधाकृष्णाची मूर्ती अवतार मूर्ती मानली जात नाही .

***बलराम -***

बलरामाची मुसळ व नांगर या आयुधावरून ओळख पटते . बलरामाच्या नांगरास अपराजीत किंवा संवर्तक नांगर म्हणतात व मुसळास सौनंद मुसळ म्हणतात . मूर्ती चतुर्भूज असेल तर डावीकडील वरील हातात नांगर खालील हातात शंख उजवीकडील वरच्या हातात मुसळ ,खालील हातात चक्र अशी आयुधे असतात , हा श्रीकृष्णाचा भाऊ गणना अवतारात केली जाते .



16337

त्याला शेषा चा अवतार मानतात .१५ बलरामाची मूर्ती बनवितांना हातात नांगर व मुसळ धारण करणारा असावा . एकाच कानात कुंडल असते ,निळे वस्त्र असते . बलराम पूजनाची परंपरा कुषाण काळात वाढीस लागली .

***बुध्द -***

बुध्द हा नववा अवतार . हा एका नव्या संप्रदायाचा प्रवर्तक . सातव्या शतकाच्या सुमारास बुध्दाला हळूहळू मान्यता मिळू लागली . दहाव्या शतका नंतर तो अवतार म्हणून प्रसिध्द पावला . बुध्दाची मूर्ती घडविताना डाव्या हाताची भूस्पर्श मुद्रा,उजवा हात मांडीवर ,काषाय वस्त्र पांघरायला ,विश्वपद्म वज्रावर बसलेला , देहावर शुभ लक्षणे ,मुख मुद्रा शांत . पण ब्राम्हणधर्मीय अशा मूर्ती नाहीत . बुध्दमूर्ती कुषाण काळात घडविल्या गेल्या ,पण ते बौध्द धर्माचे अंग म्हणून ब्राम्हण धर्मात नव्हे . पुढे कधीतरी त्याला ब्राम्हणमूर्तीशास्त्रात स्थान मिळाले . परन्तु त्याच बरोबर बुध्दाच्या पूजनाबद्‌दल निषेधाज्ञा लावून ठेवलीआहे

***कल्की-***

कल्की हा विष्णुचा दहावा अवतार , तो कलियुगाच्या शेवटी होणार असे म्हटले आहे. हा भविष्यकाळातील अवतार आहे. पण इतिहासकार म्हणतात हा सहाव्या शतकातच होऊन गेला. माळव्याचा यशोधर्म हा कल्की होय . कल्कीची मूर्ती निर्माण करताना उभारलेला खड्‌गधारी हात, क्रुद्ध अश्वारूढ , महाबल , द्विभुजकल्की निर्माण करावा. कधी चतुर्भूज आणि धनुष्यबाण धारण करणारा असावा. याच्या मूर्ती सापडत नाहीत.

गीतगोविंद मध्ये जयदेव म्हणतात,

**श्रीजयदेव-कवेः इदम् उदितम् उदारम् ।**

**श्रृणु सुखदम् शुभदम् भवसारम् ।।**

**केशव धृत-दशविश-रूप । जय जगदीश हरे ।।**

केशवा हे दहा अवतार तुझेच आहेत . तुझा विजय असो . मला जयदेवाला स्फुरलेली ही गीतगोविंद कविता तू ऐक.१६

दशावतारांप्रमाणे आणखीही काही खालील अवतार मानलेले आहेत .

***हयग्रीव -***

घोड्याचे तोंड असलेला हा विष्णूचाच एक अवतार आहे. हा अवतार फारसा प्रसिद्ध नाही. तरीइ महाभारतात, स्मृतीग्रंथांत हयग्रीव 'हयशीर्ष 'किंवा 'अश्वशिर 'या नावाने या अवताराचे वर्णन मिळते. या अवताराची आख्यायिका अशी की, देवी भागवतात अशी कथा आहे की हयग्रीव नावाच्या दानवाला देवीचा वर होता की, त्याचेच नाव धारण करणारा पुरूष त्याला मारू शकेल. या हयग्रीवाचा संहार करण्यासाठी विष्णूला हयग्रीवाचा अवतार घ्यावा लागला.. विष्णूने अश्वमुख मानवाचे रूप घेतले . व त्या असुराला मारले. मूर्तीशास्त्रात हयग्रीवाचे अंकन कुषाण कालापासून सुरू झाले आहे. या मूर्तीचे अंकन करताना मूर्ती चतुर्भूज तीन हातांत शंख,अक्षमाला व पुस्तक आणि चौथा हात व्याख्यान मुद्रेत असतो. कर्नाटकात ( मुग्गेहळ्ळी ) अशा दोन मूर्ती मिळालेल्या आहेत. एक मूर्ती उभी अष्टभूज असून पायाखाली दैत्याला तुडविणारी तर दुसरी विश्वपद्मावर बसलेली असून चतुर्भूज आहे. गुप्तकाळतही हयग्रीवाच्या मूर्ती आहेत.

***मधु कैटभारी -***

मधु व कैटभ या दोन राक्षसांना मारण्यासाठी विष्णूला हा अवतार घ्यावा लागला. जग एकार्णव म्हणजे प्रलयावस्थेत असताना विष्णूंनी आपल्या नाभीतून शंभर योजने लांबरुंद कमळ 'वज्रदंड 'उत्पन्न केले त्यावर ब्रम्हदेव आसनस्थ झाला. त्याने तेथे तपश्चर्या केली व सृष्टीनिर्मीतीस सुरूवात केली. विष्णू सुप्तावस्थेत असताना मातीचे दोन असुर केले. त्यांचा जन्म विष्णूच्या कानापासून झाला असे म्हणतात. यातील एक मऊ व दुसरा कडक वाटल्यामुळे एकास मधु व दुस-यास कैटभ असे नाव दिले. या राक्षसांनी ब्रम्हदेवाकडूनच बळ मिळवले. त्याचा त्यांना अहंकार इ ााला . व ते ब्रम्हदेवाला त्रास देऊ लागले. तेवा त्यांचा वध करण्यासाठी विष्णूला हा अवतार ह्ययावा लागला . नंतर आकाशाखाली आपल्या उघड्या मांडीवर दडपून दोघांची डोकी चक्राने कापली.

***करिवरद - वरदराज -***

गजेन्द्र नावाच्या हत्तीचा पाय पाण्यात असलेल्या मगरीने धरला व हत्तीस पाण्यात ओढू लागली. संकटात सापाडलेल्या गजेंद्राने विष्णूचा धावा केला . तेथीलच एक कमळ तोडून ते विष्णूस समर्पणाकरिता मान वर केली. गजेन्द्राच्या हाकेने विष्णू गरूडावर बसून धावून आले , व आपल्या चक्राने मगरीस मारून हत्तीस सोडविले. ' करी 'ला वर देणारा हा विष्णूचा अवतार करिवरद म्हणून ओळखला जाऊ लागला. याला हरी ही म्हणतात. याची दक्षिणेत बरीच मंदिरे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहेत . याचे अंकन करताना ही मूर्ती चतुर्भूज करतात. वरच्या दोन हातात शंख व चक्र असते. खालचे दोन हात कटीवर असतात.

***धन्वंतरी - धनवन्तरी -***

याला विष्णूचा अंशावतार मानतात. समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने प्राप्त झाली त्यात धन्वन्तरीची गणना आहे. तो वैद्यराज असून समुद्रातला अमृत कलश त्यानेच वर आणला. याच्याच अलौकिक प्रतिभेने नाना औषधींचे सार अमृताच्या रूपाने देवांना प्राप्त झाले व ते अजरामर झाले . उजव्या हातातील घटामुळे या विष्णूप्रतिमेस धन्वंतरी म्हणतात. याला विष्णू अवताराची प्रतिष्ठा मिळाली. वैष्णव मूर्तीसंभारात त्याला स्थान मिळाले . या मूर्तीचे अंकन करताना मूर्ती चतर्भूज ,तेजस्वी, पीतवस्त्रधारी, एक हात अभय मुद्रेत आणि उरलेल्या तीन हातांत कमल, अमृतघट,शल्ययंत्र यावस्तू असाव्यात, गुप्त काळात अशा प्रतिमा मिळाल्या आहेत.

***विष्णुच्या असाधारण मूर्ती ------***

***शेषशायी विष्णूमूर्ती -***

शेषनागावर झोपलेल्या विष्णूला शेषशायिन ,अनंतशयन, जलशायिन अशा विविध नावाने ओळखतात प्रकारच्या प्रतिमा कुषाण काळात मिळत नसल्या तरी गुप्त काळात अशा प्रतिमा मिळाल्या आहेत काळातील देवगढ़ येथील अशी मूर्ती उल्लेखनीय आहे . कलाकाराचेही हे आवडते रूप असते . ही मूर्ती बनविताना मूर्ती विष्णू शेषशय्येवर पहुडलेले मूर्ती द्विभूज , चतुर्भुज मस्तकावर शेषनागाचे फणाछत्र पाय आडव्या कमळात व पायाशी सेवा करणारी लक्ष्मी काही मूर्तीत विष्णूच्या नाभीतून कमळ उगवलेले असते . कमळात ब्रम्हा आसनस्थ असतो ;वर देव ऋषीगण व पुढे नारद असतो . शेषशायी प्रतिमेत अशी विचारसरणी असावी की क्षीरसागरावर विष्णू शयन करतो ;व लक्ष्मी पादसंवाहन करीत आहे . ही जलप्रलयाची म्हणजे एकार्णव स्थिती आहे . येथे सहज म्हणून विष्णूंनी बेंबीतून शंभर योजने लांबरूंद असे वज्रदंड कमळ उत्पन्न केले . त्यावर ब्रम्हदेव आसनस्थ झाले ;पुढे ब्रम्हांनी तपश्चर्या केली व सृष्टीची निर्मिती झाली . विष्णू सुप्तावस्थेत असताना मधू व कैटभ या राक्षसांनी ब्रम्हदेवाकडून बळ प्राप्त केले ;त्यांच्या भीतीने ब्रम्हदेव कमळात दडून बसले . विष्णूना या राक्षसांचा संहार करावा लागला .दक्षिणेत हा प्रकार लोकप्रिय आहे . ब-याच मंदिरातून दिसतो . कधी द्विभूज तर कधी चतुर्भूज , कधी सायुध तर

कधी निरायुध . मध्यकलेत तर यात मासे ,मगर , जलजंतू इ. दाखवितात . कधी घोडा दिसतो पण त्याचा संदर्भ कळत नाही . विष्णूच्या योगशयन मूर्तीस रंगनाथ ,रंगास्वामी असे म्हणतात . १७

**विश्वरूप ---**

विश्वरूप अर्थात विराटरूप . विष्णूचे सर्वश्रेष्ठत्व दाखविणा-या या रूपाची मूळ कल्पना पुरूषसुक्ताच्या रूपाने ऋग्वेदात आढळ्ते . या मूर्तीची दोन वैशिष्टे आढळतात .

१. काही मूर्तीत चौफेर वसु, रुद्र , आदित्य इ. मुर्ती कोरलेल्या असतात.
२. काही मूर्तीत एका बाजूला वराह व नरसिंहाचे मस्तक बनविलेले असते. विष्णूच्या प्रभामंडळात व उरलेल्या बाकी जागेतही ग्रह ,ऋषी ,दिक्पाल, गंधर्व वगैरे गट अंकित केलेले असतात .

हा प्रकार म्हणजे वैकुंठाचीच प्रगत आवृत्ती वाटते . गुप्तकाळात त्याचे षष्ठ्भूज, अष्टभूज असे प्रकार आहेत. मध्यभारतात विश्वरूपाचा अदिक विकास झाला . हात जरा आठच असले तरी तोंडे मात्र तीन पाच दिसू लागली . डावीकडे मत्स्य, कूर्म उजवीकडे सिंह , वराह, मुख्य मानवमुख , त्यावर हयग्रीव व त्याच्यावर चतुर्मुख ब्रम्हदेव अशी रचना आहे. इतर देव म्हणजे दशावतार , अष्टभैरव , अकरारूद्र प्रभावळीत दिसतात.

***चतुर्व्यूह विष्णू ---***

वासुदेव या नावाने महाविष्णूची प्रामुख्याने कल्पना केलेली असून प्रद्युम्न,अनिरूध्द, संकर्षण ही त्याची क्रमाने सृष्टी ,स्थिती ,लय करणारी स्वरूपे होत ;अशी सर्वमान्य मांडणी आहे . वासुदेवासह यांना चतुर्व्यूह अशी संज्ञा प्राप्त झाली आहे . पुढे हीच नावे कृष्ण , त्याचा भाऊ बलराम, मुलगा प्रद्युम्न व नातू अनिरूध्द या रूपाने ओळखली जातात प्रकारची एकमेव प्रतिमा मिळालेली आहे .

***वैकुंठ***

या मूर्तीत विष्णू चतुर्भूज असतो ;विष्णूंना प्रसंगी तीन किंवा चार तोंडे असतात . मुख्य तोंड मानवाचे म्हणजे वासुदेवाचे असते .डावीकडील तोंड सिंहाचे , उजवीकडील वराहाचे . गुप्तकाळापर्यंत चौथे मुख दिसत नाही . कधी कधी वासुदेवाच्या मुखावर अश्वमुख असलेली आवक्षमूर्ती दिसते . सिंह हा संकर्षणाचे ,वराह प्रद्युम्नाचे व अश्वमुख पुरूष ,अनिरूध्दाचे प्रतीक

मानले जाते . सिंह,मानव व वराह मुख असलेल्या प्रतिमा वैकुंठ नावाने ओळखल्या जातात . मथुरेच्या गुप्त कलेत या प्रतिमांचा उगम झाला असावा . त्यावेळी या प्रतिमेत हातांची संख्या फारच कमी होती ;पण पुढे ती वाढली . विष्णूधर्मोत्तर पुराणात वर्णन करताना मनुष्य ,वराह ,कपिल किंवा स्त्री अशी चार तोंडे असून हात मात्र आठ असतात . ही मुखे प्रामुख्याने ज्ञान ,शक्ती ,ऐश्वर्य ,बल या गुणांचे प्रतिनिधीत्व करतात .

मध्य भारतीय कलेत वैकुंठाच्या प्रतिमा आढळतात. त्याची आख्यायिका म्हणजे एकच शरीर धारण करून निवास करणा-या तीन असुरांचा विष्णूने सौम्य, नृ सिंह,वराह ,कपिल,अशा संयुक्त स्वरुपांचा आश्रय घेउन केला. गरुडारुढ अष्टभूज वैकुंठाची मूर्ती असते आठ हाताची . कमळ ,बाण ,गदा ,खड्ग ,ढाल ,चक्र ,धनुष्य व शंख अशी आयुधे असतात . सिंह ,मानव ,वराह , घोडा अशी तोंडे असतात . अवन्तिपूर येथील खोदकामात ब-याच वैकुंठ प्रतिमा मिळाल्या आहेत . त्यात सिंह ,वराह , मधले मानव व चौथे राक्षसाचे विकराल मुख असते . हे काश्मिरमध्ये जास्त आढळते .

***अनन्त --***

अनन्त या शब्दात विष्णू व शेष या दोघांचाही बोध होतो . या दोघांच्या एकरूपतेला मान्यता आहे . काही विष्णूमूर्तीत चतुर्भूज विष्णूच्या मस्तकावर सर्प फणा व पाठीकडे सर्पाचा वेटोळेदार आभोग स्पष्ट दिसतो .

***त्रैलोक्यमोहन ----***

गरूडाच्या खांद्यावर मांडी घालून बसले ला विष्णू असा उल्लेख भागवतात आढळतो . तेथे त्याला त्रैलोक्यमोहन म्हणतात . अपराजितपृच्छेनुसार याला सोळा हात व वराह सिंहादी चार तोंडे असावीत. तर अग्नी पुराणाच्या मते हा विष्णूचा अंश अष्टभूज असून आठ आयुधे असावीत उभयपार्श्वी लक्ष्मी व सरस्वती असतात.

***हरिहर -***

शैव आणि वैष्णव या दोन संप्रदायात वेळोवेळी द्वंद्वे माजली व ती मिटविण्याचे प्रयत्नही निरनिराळ्या क्षेत्रात केले गेले . मूर्तीशास्त्रातील तसा एक प्रयत्न हरि आणि हर यांची संयुक्त प्रतिमा घडविणे हा होय. अशा प्रकारच्या मूर्तीत उजवीकडे शिव व डावीकडे विष्णू असतो. त्यांना

अनुसरुन केश, वस्त्रे, दागिने, आयुधे वगैरेची रचना करतात. ही प्रतिमा स्थानक असते . सर्प जटा ही शिवाची तर शंख वनमाला ही विष्णूची वैशिष्टे एकत्र दिसतात.

तत्वतः हरिहरामध्ये कोणताही भेद नाही. शिवभक्त आणि विष्णूभक्त यांच्यातील वाद मिटविण्यासाठी शिवाने हरिहराचे अद्‌भुत रूप धारण केले. शिव अर्ध्या अंगाने विष्णू झाला. शिवाचा वर्ण कर्पूरगौर तर विष्णूचा मेघश्याम. डाव्या हाती शंख, हृदयावर श्रीवत्स व कानी कुंडले ,मुकुट. उजव्या अंगी अस्थीमाला, त्रिशूल, सर्पवेष्टन, मस्तकी गंगा असते .

***नरनारायण -***

ऋग्वेदाच्या इंद्राविष्णूतच नरनारायणाचे मूळ दडलेले आहे. हे विष्णूचे जोडरूप आहे. नरसिंह अवताराच्या मानवी भागापासून नर आणि सिंह मुखापासून नारायण झाला ;असे कालिका पुराणात सांगितले आहे . भागवतात यानाच ऋषी म्हटले आहे . त्या दोघांनी उग्र तप केले पुढे कृष्णार्जूनाच्या रूपात अवतरले . पुराणकाळात नरनारायणाची उपासना सुरू झाली ;असे उल्लेख महाभारतात सापडतात .

***लक्ष्मी नारायण--***

हे दोन रूपात दिसतात . एक सिंहासनावर आलिंगन मुद्रेत बसलेली . दुसरी गरूडाच्या पाठीवर आरूढ असलेली . गरुडारूढ विष्णू कधी चतुर्भूज असतो ,तर क धी अष्टभूज . अष्टभूजविष्णूच्या हातात पाश ,खड्‌ग ,बाण ,अभयमुद्रा डावीकडे शंख ,धनुष्य वगैरे दिसतात . नीलकमल घेतलेली चार हाताची लक्ष्मी त्रिश्रृंग मुकुट असलेला विष्णू कमरेखाली पक्षीपण चोच असलेला गरूड असे अंकन असते .

***अर्धनारीविष्णू ---***

सर्वसामान्यपणे अशा प्रकारच्या मूर्ती शिवपार्वतीची एकत्र मूर्ती असा निघतो . पण उत्तर भारतीय कलेतील (कश्मीर ) अशा प्रकारची उणीव राहू दिली नाही . दहाव्या शतकातील अर्धनारी विष्णुची एक प्रतिमा सापडते . विस्णूची ही मूर्ती गरूडारूढ आहे. मूर्तीला एकूण आठ हात आहेत . उजवीकडील म्हणजे विष्णू भागातील हातात प्रदक्षिणा क्रमाने पद्म , गदा , शंख ,चक्र, चक्र अशी आयुधे असून लक्ष्मी भागात ग्रंथ , आरसा, सनाल पद्म, घट ही आयुधे दिसतात. अर्धनारी विष्णू कमलासनावर बसलेल्या गरूडावर आरुढ आहे . ह्या सहा हाती गरूडाचे नाक पक्ष्याचे असून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कमरेखालील भाग तसाच आहे . त्याचे सामान्य दोन हात नमस्कार मुद्रेत जोडालेले आहेत . मधले दोन खांद्यावर बसलेल्या विष्णूचे पाय धरीत आहेत, व उरलेल्या दोन हातात उजवीकडे शिंग व डावीकडे पाण्याचा घट आहे.अशा प्रतिमा क्वचितच दिसतात.

***श्रीनिवास - व्यंकटेश -***

डावाहात कमरेवर ठेवून हातात चक्र, शंख घेतलेल्या विष्णूला श्रीनिवास /व्यंकटेश /बालाजी म्हणून ओळखतात. विष्णूच्या या व्यंकटेशरूपाचे महत्व जास्त आहे. दक्षिणेत तर तो आम जनतेचा उपास्य देव बनून राहिला आहे. ही मूर्ती शैव आणि वैष्णव प्रतिकांनी युक्त अशी आहे . व्यंकटेश मूर्ती ही काळ्या पाषाणाची आहे . लक्ष्मीदेवता हा या मूर्तीचा अविभाज्य घटक आहे. ती त्याच्या हृदयावर कोरली आहे. या मूर्तीचा डावा कट्यवलंबी हात असे सुचवीत असावा की, भक्ताकरिता भव समुद्र कमरेइतकाच खोल आहे.

***जगन्नाथ -***

जगन्नाथ हेही वैष्णव शिल्पच आहे ओरिसातील पुरी येथे जगन्नाथ मंदिर आहे. दोन बाजूला कृष्ण, बलराम व मध्ये सुभद्रा असे ते काष्ठशिल्प आहे. या शिल्पांना हात नाहीत पाय नाहीत. तीन ठोकळे दिसतात. या शिल्पाला ' दारूब्रम्ह ' म्हणतात. १८

***विश्वक्सेन -***

हा विष्णूचा अंशरूप देव आहे. विष्णूचे निर्माल्य धारण करणे हेच याचे काम आहे. दक्षिणेत वैष्णव मंदिरात महोत्सव निर्विघ्नपणे पार पडावेत म्हणून विश्वक्सेन याची पूजा करतात. हा विष्णू मंदिराचा रक्षक असतो. तो चतर्भूज असून दक्षिणामुख असतो. तीन हातांत शंख , चक्र , गदा आणि चौथ्या हाताची तर्जनी उभारलेली असते. उजवा पाय खाली सोडलेला व डावा पाय दुमडलेला अशा अवस्थेमध्ये असलेल्या याच्या बैठ्या ( आसन ) मूर्ती असतात.

***पांडुरंग - विठ्ठल -***

मातापित्याची सेवा करणा-या पुंडलिक नावाच्या ब्राम्हणावर प्रसन्न होऊन कृष्णाने पांडुरंगाचे रूप घेतले अशी कथा आहे. विठ्ठलाचा विचार वैष्णव अंगाने केला तर कृष्ण हा विष्णूचा अवतार आणि विठ्ठल हे कृष्णाचे बालरूप असा संबंध लागतो सर्व प्रिय वस्तू विठ्ठलासही प्रिय आहेत.

ज्ञानदेवांच्या मते श्रीविष्णूच विठ्ठलरुपाने अवतरला आणि त्याने सुदर्शन चक्रावर पंढरी वसविली . द्वारकेहून गायी गोपालासह आलेला कृष्ण म्हणजेच विठ्ठल अशी वारकर्यांची धारणा आहे. विठ्ठल हे विष्णूचेच अपभ्रष्ट रूप आहे. असे बहुतेक मानतात. विठ्ठलाची प्रतिमा द्विभुज अस्ते. विटेवर समपाद अवस्थेत उभा असतो . त्याच्या एका हातात शंख असून दोन्ही हात कमरेवर ठेवलेले असतात .

***सूर्यनारायण -***

सूर्य मूर्तीचा विचारही वैष्णव अंगानेच करायला हवा . विष्णू हे सूर्याचेच उत्क्रांत रूप होय . भारतात सूर्योपासना ऋग्वेद कालाहूनही प्राचीन आहे. ऋग्वेदात तिचे उदात्तीकरण झाले आहे.

सहाव्या शतकानंतर प्राचीन काळाची मर्यादा ओलांडून आपण मध्यकाळात प्रवेश करतो . काळाबरोबर मूर्तीमध्येही काही परिवर्तने होत जातात . सखोल दृष्टीने जर आपण दृष्टीक्षेप टाकलातर प्राचीन काळात उत्तर भारतीय कला वदक्षिण भारतीय कला यांच्यामध्ये बरीचशी एकरूपता दिसून येते . पुढील काळात या भारतीय कलेत अनेकरूपता निर्माण झाल्याचे दिसते . या विविधतेचा अभ्यास करून तेथील सर्वसामान्य गोष्टीचा अभ्यास केला तरच मध्यकालीन मूर्ती शास्त्राचे आकलन लवकर होईल असे वाटते .

मध्यकाळात विविधतेने नटलेल्या मूर्ती दिसू लागल्या . कलेला काळाने प्रभावित केले असे म्हटले तर ते काही वावगे ठरणार नाही . विविधतेच्या दृष्टीने थोडे पोटभेद करवे लागतील पण ते आपण पुढे करणार आहोत . मध्यकालीन मूर्तीची साधारण रचना जर आपण पाहिली तर असे दिसते या काळातील जास्तीतजास्त प्रतिमा सपाट पाठीच्या आहेत .त्यामुळे त्यांचा पृष्ठभाग पाठशिळा युक्त असतो .१९ ही पाठशिळा मुख्यमूर्तीच्या डोक्यापेक्षा थोडी उंच असते . प्रतिमामध्ये श्रीमूर्तीला पाठशिळेपासून थोड्या प्रमाणात सुटे दाखविण्याचा प्रयत्न केलेला असतो . छाया आणि प्रकाश यांच्या मदतीने हा प्रयत्न सफल होण्याकरीता काही उपाययोजना असतात . मूर्तीच्या छातीपासून पायापर्यंतच्या भागाच्या दोन्ही बाजूला पाठशिळेमध्ये त्याचआकाराची खाच करतात.आणि त्यामुळे निर्माण झालेल्या या पोकळी मुळे ती प्रतिमा मागच्या पाठशिळेपासून अगदी सुटी दिसू लागते , कधी कधी अशी छिद्रे मस्तकाभोवतील प्रभामंडळात ही करतात . जरी मूर्ती

पाठशिळेत चिकटलेल्या तरी जागा मिळाल्यास त्याच्या आजूबाजूस दर्शनी भागाइतकेच कोरीव कातीव काम बारकाईने काळजीपूर्वक केले जाते.

प्रतिमेच्या सर्व घटकांचा विचार करीत असताना अगदी खालीपासून पहात गेलो तर पहिला घटक म्हणजे पीठ किंवा वाहिका पट . वाहिकेचा दगड साधा चौकोनी तरी असतो किंवा त्याचे टोकदार अंश पुढे निघालेले असतात. त्याना रथ असे म्हणतात . उभ्या टोकांना पुरित असे म्हणतात.२० रथाच्या संख्येप्रमाणे वहिकेला त्रिरथ , पंचरथ , सप्तरथ अशा संज्ञा दिल्या जातात. वाहिकेच्या दर्शनी भागावर मधोमध कमळाचा दांडा व आजूबाजूस पद्मलता पसरलेली दाखविण्याचा प्रघात आहे . याला अपवाद हे असतातच . पद्मलतेच्या वेटोळ्यात श्रीमूर्तीचे वाहन , एकटा किवा सपत्निक मूर्तीस्थापक, हातात घागरि घेतलेले समुद्र, नाग व त्याच्यामध्ये पृथ्वी व इतर बारक्या आकृती किंवा पूजेची उपकरणे इ. वस्तू दाखवीतात. या ठिकाणी कधी कधी शिलालेखही लिहलेला आढळतो. या वाहिकेवर कधी कधी लहान किंवा मोठे दुहेरी कमळ पसरलेले असते, त्याम्ळेए अशा या पीठाला 'महाबुंजपीठ 'असेही म्हणतात. २१या महाबुंजावरच श्रीमूर्तीचे पाय टेकलेले असतात. या ओटयापासूनच पाठशीलेचा प्रारंभ होत असतो. कधी कधी या पाठशिळेवर प्रभामंडळाचे वेगळे आस्तित्व नसते. कारण ही पाठशिळा संपूर्णपणे प्रभामंडळाचे कार्य साधत असते. आणि यामुळेच तिला आपण प्रभावळ या नावाने ओळखतो. तरीपण बहुतेक श्रीमूर्तींच्या मागे प्रभामंडळ हे स्वतंत्रपणे दाखविलेले असते.

मुख्य प्रतिमेच्या पायाच्या बाजूस काही परिवार देवतांची स्थाने असतात. येथूनच मागच्या बाजूला द्वारशाखाही दिसू लागतात. द्वारशाखेच्या बाहेरील बाजूस (कडेला ) हे अलंकरण दिसू लागते. हत्ती व त्याच्या मस्तकावर मागील पाय टेकून पुढचे पंजे उचलून झेप घेणारा सिंह म्हणजे 'गजशार्दूल होय.२२. व्यालाचेही अनेक प्रकार असतात. गजशार्दुलाचे वर मगरीचे तोंड किंवा मकरी दिसते. दोन्ही बाजूंस दिसणारी ही मगरींची तोंडे म्हणजे द्वारशाखेवर ठेवलेली मकरमुखी तुळई. मुख्य श्रीमूर्तीचे खांदे येथपर्यंत आलेले असतात. पुढील अलंकरणे जी आहेत त्यात कालांतराने थोडाफार फरक होत गेला आहे. त्यामुळे ती थोडीफार भिन्न दिसतात. पालकलेमध्ये बहुतेक एकेक मोर किंवा मयूरक दिसतो. तर कोठे कोठे किन्नरही आढळून येतात. याच्याजवळ ब-याच ब्राम्हणधर्मीय मूर्तीत तीन पैकी दोन कोनाडे किंवा राधिका दिसतात. यापैकी मधली राधिका असतेच

असे नाही . आणि असलीच तर थोडी वर आणि पाठशिळेच्या मधोमध असते . राधिकेत असलेल्या मूर्तीला 'राधिकाबिंब ' असे म्हणतात. विष्णूमूर्तीत राधिकाबिम्ब म्हाणून ब्रम्हा, विष्णू , शिव आढळतात. राधिकांच्या जवळच श्रीमूर्तीच्या मस्तकाभोवती असणारे प्रभामंडळ हे गंधर्व , विद्याधर कधी एकटे तर कधी सपत्नीक असतात. कधि कधी ते ढगात उडत आहेत असेही दाखवितात. आणि सर्वात शेवटी पाठशिळेवरचे वरील टोक किंवा श्रृंग यावर मात्र निरनिराळी अलंकरणे दिसतात. कीर्तीमुख छत्र, कमळ, आंब्याची पाने फळे, ग्रास किवा देवदुंदुभी, बोधीवृक्ष , मुगुट वगैरे अनेक प्रकार देश, काल , प्रयोजन यांच्या भिन्नतेने दिसतात.

वर वर्णन केलेली अलंकरणे व त्यांचा क्रम थोड्याफार फरकाने उत्तर भारतात सर्वत्र आढळतो.हा पाहून असा प्रश्न पडतो की हा सर्वमान्य क्रम एक रीत म्हणून पाळला जात अस्तो की याच्या मुळाशी काही तर्कशुद्ध चौकट (बैठक) आहे ?

या बाबतीत प्रोस्टेला क्रॅमरीश म्हणतात की, "ज्या आसनावर श्रीमूर्ती बसलेली किंवा उभि आहे त्याचा पाठ टेकण्यासाठी केलेला भाग म्हणजे पाठशिळा. ही पाठशिळा आसन किंवा सिंहासनाचेच एक अंग आहे . त्यामुळे तिच्या अलंकरणाकडेही लक्ष पुरवित असावेत." आणि तिला गज, सिंह अशा आकृत्यांनी अभिमंडित करित असावेत . पाठशिळेवर दिसणा-या 'द्वारशाखा ' 'व्याल' मकर्मुख तोरण किंवा 'ललाटिका ' 'राधिकाबिम्ब' 'कीर्तीमुख' वगैरे अलंकरणाचा विचार केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की पाठ्शिळेत पेरली गेलेली ही अलंकरणे मुलात गृह किंवा मंदिर शिल्पात वापरली जात असत. यांचा संबम्ध मुख्य द्वाराशी आहे. मग ते गर्भगृहाचे द्वार असो किंवा महालाचे सिंहद्वार असो. त्यामुळे पाठशिळेवरहि दाराचाच आभास उत्पन्न केला जाई. अशी विचारसरणी जर गृहीत धरली तर देवगृहाच्या आत संस्थापित श्रीमूर्ती उपासकावर प्रसन्न होऊन त्याला भेटण्याकरिता गर्भगृहाच्या दारापुढे किवा सिंहासनापुढे उभी राहिली आहे. असे म्हणणे वावगे होणार नाही.

या खेरीज असाही अर्थ काढता येईल की वाहिकेशी संबंधीत अलंकरणे म्हणजे कमललता ,कूर्म , नाग ,घागरी घेतलेले समुद्र हे होत. पण्याचे प्रतिनिधीत्व करणा-या या गोष्टी पर्यायाने पाताळाचे प्रतिनिधीत्व करतात वाहिकेचा खालचा भाग म्हणजे पाताळ व वरचा म्हणजे पृथ्वी अशी संगती लावता येते . पृथ्वी म्हणजे गर्भगृहाची भूमी . येथूनच द्वार शाखा व बाह्यपक्षाची सूरुवात

होते .याच भूमीवर परिवार देवता उभ्या असतात . व त्यांच्यावर (पाठीकडे) पृथ्वीची प्रतीके म्हणून गजसिंह दिसतात . कधी या दोघांच्या मधल्या भागात व्याला माणसे व योध्देही दिसतात . येथपर्यंत भूलोकाचे अंकन झाले . ललाटिकेवर दिसणारे मोर व किन्नर पृथ्वीच्या आकाराचे प्रतिनिधीत्व करतात . यावर रथिकेचा भाग ब्रम्हदेव ,विष्णू व महादेव यांची मंदिरे ,भूलोकाच्या ब-याच वर असावी . हे विधान औचित्यास धरुनच आहे . त्यामुळे या भागाला स्वर्गलोक असे नाव देता येईल . सर्वात वरचे टोक म्हणजे श्रृंग पालकलेत येथे पुष्कळ वेळा ग्रास किंवा कीर्तिमुख दिसते२३ . खालच्या टोकाला सृष्टीचे उत्पादक महांबुज आणि त्याचा पसारा ,तर वरच्या टोकाला महाविनाशाचे प्रतीक ग्रास या दोन्ही प्रतिकांच्या मध्ये मूर्तिकार निरनिराळ्या प्रतिकांच्या मदतीने अशा विश्वाची कल्पना करीत असतो की ज्यामध्ये श्रीमूर्ती सामावलेली आहे .

विष्णूमुर्तीचा आयुधरचनेचा क्रम हा आयुधरचनेचा मुख्य आधार धरुन मध्यकालामध्ये काही वर्गिकरणे मांडली आहेत .

***<u>विष्णूंच्या चोवीस नावांच्या मूर्ती</u>***

(खालच्या उजव्या हातापासून घड्याळी दिशेने आयुधक्रम दिला आहे.)

च = चक्र , शं = शंख , ग = गदा , प = पद्म .

| अ. नं. | विष्णूनाम | आयुधक्रम |
|---|---|---|
| १ | केशव | प शं च ग |
| २ | नारायण | शं प ग च |
| ३ | माधव | ग च शं प |
| ४ | गोविंद | च ग प शं |
| ५ | विष्णू | ग प शं च |
| ६ | मधुसूदन | च शं प ग |
| ७ | त्रिविक्रम | प ग च शं |
| ८ | वामन | ग शं च प |
| ९ | श्रीधर | प च ग शं |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

| | | |
|---|---|---|
| १० | हृषिकेश | ग च प शं |
| ११ | पद्मनाभ | शं प च ग |
| १२ | दामोदर | प शं ग च |
| १३ | संकर्षण | ग शं प च |
| १४ | वासुदेव | शं च ग प |
| १५ | प्रद्युम्न | च शं ग प |
| १६ | अनिरुद्ध | च ग शं प |
| १७ | पुरूषोत्तम | च प शं ग |
| १८ | अधोक्षज | प ग शं च |
| १९ | नरसिंह | च प ग शं |
| २० | अच्च्युत | ग प च शं |
| २१ | जनार्दन | प च शं ग |
| २२ | उपेन्द्र | शं ग च प |
| २३ | हरि | शं च प ग |
| २४ | कृष्ण | शं ग प च |

वरील सर्व मूर्ती स्थानक स्वरुपाच्या असून आयुधक्रमाच्या भिन्नतेशिवाय त्यांच्या लक्षणात इतर कोणताही भेद किंवा फरक दिसून येत नाही . ही आयुधे म्हणजे शंख ,चक्र, गदा, पद्म . इतर आयुधांचा येथे विचार केलेला नाही त्यातील शंख ,चक्र ,गदा ही आयुधे जुनीच आहेत. पण पद्म हे गुप्त काळाच्या शेवटपर्यंत दिसलेले नाही . म्हणजे या सर्व प्रकारचे वर्गीकरण गुप्तोत्तर काळातील किंवा त्यानंतरचे म्हणजे इसवीसनाच्या सहाव्या शतकानंतरचे असावे . आता प्रश्न निर्माण होतो आयुधाची मोजणी कशी करावयाची ?साधारणपणे हा क्रम घड्याळाच्या आकडयाप्रमाणे म्हणजे प्रदक्षिणा क्रम असावा हे सर्वमान्य आहे . पण तो सुरू कुठून करावा ?यात मतभिन्नता आहे . तरी खालच्या उजव्या हातापासून मोजणी सुरू करणे पुष्कळांना मान्य आहे. त्यावरूनच ही आयुधे व विष्णूरुपांचा क्रम ठरविलेला आहे .

विविधतेच्या दृष्टीने येथे उत्तर भारतीय कला व दक्षिण भारतीय कलाअसे दोन ठोकळ भेद करता येतील . उत्तर भारतीय कलेत पूर्व भारतीय ,मध्यभारतीय व पश्चिम भारतीय असे तीन पोटभेद करता येतील ,त्या नंतर उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय कलेचा विचार करुन जमेल तितकी वाड्मयाशी सांगड घालू .

***पूर्वभारतीय कला - विष्णू***

पूर्व भारतात बंगाल ,बिहार ,उत्तर प्रदेशाचा पुर्व भाग यांचा समावेश होतो. कुषाण काळ गांधार , मथुरा शैलीने गाजविला . तर गुप्तकाळातील सारनाथ येथील शिल्पे नेत्रदीपक होती . या सर्व शिल्प परंपरांची छाप आपल्याला पूर्व भारतीय शिल्पांमध्ये दिसून येते. आठव्या शतकापर्यंत या भागात तुरळक कलाकृती घडत होत्या . इ. स. ७५० मध्ये बंगालच्या गादीवर पालराजा गोपाल हा सिंहासनारूढ झाला . आणि सर्व चित्रच बदलले. पुर्व भारतीय कलेचे एक वेगळे रूप आकार घेऊ लागले. बंगाल, बिहार हि कलेची माहेरघरे बनले आणि तेथील कलाकृती काश्मीर लंकेपर्यंत पसरल्या . नेपाळ, तिबेट, जावा, म्यानमार हे देश कायमचेच या कलेच्या प्रेमात अडकले . पुढे इस्लामची आक्रमणे झाली आणि बंगाल बिहारमधील ही कला संपुष्टात आली. इतर ठिकाणी (नेपाळ,तिबेट)असलेल्या या कलेच्या परंपरा मात्र चिरकाल जीवित राहिल्या .

पालांच्या काळात मोठ्या प्रमाणावर बौध्द प्रतिमा घडविल्या गेल्या . या वंशाचे काही राजे सूर्योपासक ,शिवोपासक होते . त्यापैकी लक्ष्मणसेन हा विष्णूभक्त होता ,यामुळे पूर्व भारतीय कलेच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजे अकराव्या बाराव्या शतकात विष्णुमूर्तीची संख्या चांगलीच वाढलेली आहे . या काळात पूर्व भारतीय कलेचे मुख्य माध्यम होते संथाल परगण्याच्या राजमहल येथील खडकापासून मिळणारा कश्ती पाथर नावाचा निळसर दगड याचे दोन प्रकार असत ओबड धोबड वदुसरा जास्त गुळगुळीत .याखेरीज या कलेत काष्ठ ,माती ,स्टको आणि अष्टधातू अशी माध्यमे वापरली जात .२४

***मूर्तीची वैशिष्टे ----***

अकराव्या व बाराव्या शतकात बंगाल मध्ये विष्णूभक्तीची एक लाटच आली होती . त्यामुळे आठव्या शतकात जरी तुरळक प्रतिमा दिसत तरी अकरावे व बारावे शतक हा भरभराटीचा काळ होय. कारण याकाळात मूर्तिकला जशी नावारुपाला आली त्याचबरोबर वाड्मयीन

शब्दचित्रेही रेखाटली जाऊ लागली . पद्मपुराण ,ब्रम्हवैवर्तपुराण इ. ग्रंथांनी विष्णूंना शब्दचित्रामध्ये उभे केले , या काळात पारिभाषिक शब्दावली ,रेखाचित्र उभे करण्याचा कलाकारानी प्रयत्नकेला आहे .

या काळातील विष्णूप्रतिमा बहुतेक स्थानक असून समभंग स्वरुपातील आहेत . क्वचीत काही आसनमूर्ती दिसतात आणि शयनमूर्ती जवळ जवळ नाहीतच . मध्य काळात परिवार देवतांचा उगम झाला होता . त्यालाही पूर्व भारतीय कला अपवाद नाही . श्रीमूर्ती ही सर्वात उंच असते , त्याखालोखाल लक्ष्मी ,सरस्वतीची मूर्ती असते . आणि त्यापेक्षाही आयुधपुरुष ठेंगणे दाखवितात . व यांच्यापुढे गरुड ,गंधर्व हे किरकोळ दाखवितात . पाल विष्णूप्रतिमेत रथिकाबिंब, ब्रम्हदेव ,शंकर नसतात. विष्णूंच्या पायाखालील महांबुजपीठ ,उडणारे विद्याधर हे ब-याच ठिकाणी दिसतात , विष्णूंच्या पायाच्या बाजुला लांब दांड्याचे कमळ दिसते .हे दांडे सामान्य हातापर्यंत उंच असतात . हे शंख व वरद मुद्रेत असलेल्या हाताच्या पाठीमागे चिकटलेले असते . बहुतेक प्रतिमा उद्बाहू आहेत. प्रलम्बबाहू हा प्रकार गुप्तकाळाबरोबरच मावळला .प्रभामंडळ लंब किंवा गोलाकार दिसते . त्यातील अलंकरणे बेताचीच असतात . विष्णूप्रतिमेचा चेहरा सौम्य व लोभस असतो . नाक ,डोळे ,हनुवटी ,भूवया अतिशय तरतरीत असतात . बोटे नाजुक तर आयुधाची पकड दृढ नसते . नेसूचे वपांघरलेले अशी दोन वस्त्रे दिसतात .दागिने विपुल असतात . सर्व बोटात अंगठ्या मनगट कोपर यामध्ये माळेसारखा दागिना ,पायात नूपुर ही वैशिष्टे ,मुकुट बसका ,उंच सोन्याचे जानवे व मधली रत्नखचित गाठ ,आयुधात कधी लांब तर कधी आखूड गदा . शंखाची पकड नेहमीसारखीच .सामान्य उजवा हात वरद मुद्रेत ,विशेष म्हणजे मधल्या कालात आयुधपुरुष लुप्त झाले ,काही प्रतिमा याला अपवाद आहेत .

अवतार प्रतिमामध्ये नैसर्गिक मत्स्याला मानवी हात दाखवून केलेला मत्स्यावतार , कृष्णाऐवजी आठवा अवतार बलराम , नृवराहाच्याही मूर्ती दिसतात . वामनाचे बटू ,चतुर्भूज विष्णू, त्रिविक्रम या तीन रुपात अंकन ,नरसिंहाच्याही मूर्तीचे विविध प्रकार मिळतात . पालकलेत रामाचे स्वतंत्र अस्तित्व नाही ,कृष्णलीलेच्या प्रतिमा दिसतात . या खेरीज हरीहर ,सूर्य ,वैकुंठ , विश्वरुप अशा विविध मूर्ती पूर्वभारतीय कलेत आढळतात .

***पश्चिम आणि मध्य भारतीय कला -----***

पश्चिम आणि मध्य भारतात राजस्थान , गुजरात, पश्चिमी उत्तरप्रदेश , मध्य प्रदेश या भागांचा समावेश होतो .मूर्तीशास्त्राच्या दृष्टीने या प्रदेशातील काही ठराविक केन्द्रावर आढावा घ्यावा लागतो. एक गोष्ट मात्र स्पष्ट होते की, काही भागात उत्तर व दक्षिण कलेचा संगम झालेला दिसतो. चालुक्य व राष्ट्रकूट राज्यांच्या या कलेला बराच वाव मिळाला .

***विष्णुप्रतिमेची वैशिष्ट्ये --***

मध्ययुगीन विष्णूप्रतिमा आपण पाहिल्या तेव्हा त्यात राधिकाबिम्बाच उल्लेख झालेला होता. पण पूर्व भारतीय कलेत ही राधिकाबिंबे दिसत नव्हती. त्या राधिका पश्चिम भारतीय कलेत स्पष्ट दिसतात . उजवीकडे ब्रम्हदेव आनि डावीकडे शंकर दिसतो .मध्य राधिकेत विष्णुदर्शन घडते .मद्य राधिकेत विष्णूमूर्ती आसनमूर्ती असते . मागील हातात शंख ,चक्र, किंवा गदा ,चक्र असते. साधारण हात मांडीवर ठेवलेले असतात. या प्रकारास योगनारायण म्हणून ओळखतात. २५काही ठिकाणी अशाच प्रतिमेत मागील हातात आयुधे नसून फक्त पद्मे असतात. याप्रकारास सूर्यनारायण म्हणून ओळखतात. आयुधात कमळचे दर्शन डोळ्यात भरते . त्यामुळे चारही आयुधे दिसतात . आयुधांबरोबर अक्षमाला, घाट कधी फळ दिसते. फळ क्वचितच दिसते . सामान्य उजवा हात वरद मुद्रेतच दिसतो . दागिन्यांमध्ये करंडक मध्यम उंचीचा, सोन्याचे जानवे गुडघ्यापर्यंत लोंबणारे, सर किंवा साखळ्यासलेली मेखला , पायात चाळ, नुपुरे, पायाच्या बोटांत अंगठ्या दिसतात. या मूर्तीत परिवार देवतांमध्ये लक्ष्मी सरस्वतीची जोडी दिसते. कधी सरस्वतीऐवजी गरूड असतो. पाठीशी आयुधपुरूष, विष्णूची तिसरी पत्नी पृथ्वी हिला बहुतेक विष्णुच्या पायामध्ये चरणशिळेवर दाखवितात. ती कासवाच्या पाठीवर बसलेली असून दोन नागांच्यामध्ये असते. कारण नाग पाताळाचे ,पाण्याचे प्रतीक असून पृथ्वीचा आधार महाकूर्म असते. आयुधपुरूषात गदा स्त्रीरूपीणी , व शंख ,चक्र , पद्म पुरूषरूपात दाखवितात. त्याच्या स्थानाविषयी कोणताच दंडक नाही . लक्ष्मी व गरूड याण्च्या पाठीशी वैष्णव आयुधे घेतलेले द्वारपाल दिसतात. विद्याधरही दिसतात. कधी उडते तर कधी ढग़ात दिसतात.

अवतार प्रतिमांमध्ये मत्स्य अवतारात चार मानव मूर्ती किवा मानव मस्तके असलेले अंकन म्त्स्याच्या पाठीवर करतात . मत्स्याने पाण्यातून वर आणलेल्या वेदांचे हे प्रतीक होय. कूर्म अवतारात समुद्रमंथनाचे दृष्य, कासवाच्या पाठीवर वासुकीने वेढलेला मंदराचल , बाजूला देव

दानव म्हणून दोन पुरूष, समोर पृथ्वी, वराहप्रतिमेत यज्ञवराह असतो. हा तोंडापासून शेपटीपर्यंत निरनिराळ्या देवप्रतिमांनी वेढलेला असतो. पशुवराह व नृवराह अशी दोन रूपे असतात. हिरण्यकश्यपूचे पोट फाडाणारा नरसिंह दिसतो तर कधी तो हिरण्यकश्यपूशी झगडताना दिसतो. वामनप्रतिमेत चतुर्भुज वामन विष्णू व हातात छत्र घेतलेला बटू, दिसतात. राम व परशुराम या दोघाना परशू व धनुष्य या आयुधाने ओळखावे लागते.आठवा अवतार बलराम दाखवितात.कधी चतुर्भुज, नाग, मुसळ, मद्याचा पेला या चिन्हासह दिसतो . कल्की घोडेस्वाराच्या रूपात दिसतो. याखेरीज काही अवतार दिसतात. त्यात करिवरद, हयग्रीव, सूर्यनारायण, योगनारायण, मौनव्रतीम, वैकुंठ, विश्वरूप, त्रैलोक्यमोहन, वृषभानन विष्णु अशा विविध मूर्ती आढळतात.

***उत्तर भारतीय कला - विष्णू -***

उत्तर भारतात प्रामुख्याने काश्मीर नेपाळचा भाग गृहीत धरलेला आहे . येथे फक्त काश्मीरचाच विचार केला आहे . येथील सर्व प्रतिमा मध्य काळातीलच आहेत . या प्रतिमावर काश्मीर शैलीची छाप दिसते . नवव्या शतकात बांधल्या गेलेल्या अवंती स्वामींच्या मंदिराचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल . अवंतीपूर येथील खोदकामात संपूर्ण किंवा खंडीत अशा सुमारे २७ विष्णूप्रतिमा मिळाल्या आहेत . त्यातील ब-याच प्रतिमा वैकुंठ रुपातील आहेत

***विष्णू प्रतिमा वैशिष्टे ---***

विष्णू प्रतिमा या बहुतेक चतुर्भूज असून प्रलम्बबाहू आहेत सामान्य हातात पद्म ,शंख मागचे हात चक्रपुरुष ,गदादेवी यांच्या डोक्यावर . दागिन्यामध्ये विष्णू मुकुट त्रिश्रृंग असतो . २६ तुरा किंवा मुगुटबंध नसते . दागिने विपुल असतात . पायापर्यंत रूळणारी वनमाला. या शैलीतील विषेश म्हणजे विस्णूच्या कमरेत उजवीकडे खोवलेली कट्यार . दोन्ही पायात कमरेपर्यंतची दिसणारी स्त्रीमूर्ति ही पृथ्वी होय . मुर्तीतील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे मूर्तीत लक्ष्मी, गरूड , किंवा इतर परिवार देवता दिसत नाहीत .

अवतार प्रतिमेतील विशिष्ट प्रतिमात वैकुं ठाच्या प्रतिमा दिसतात. काश्मीरमध्ये वैकुंठरूप विशेष लोकप्रिय होते असे दिसते. अवन्तीपूरच्या खोदकामात या अवताराच्या ब-याच प्रतिमा मिळाल्या आहेत. या प्रतिमांचे वैशिष्ट्य असे की, हात चार असतात. परंतु मुखेही चार असतात. उजवीकडे सिंह, डावीकडे वराह, मधले मानव,व चौथे राक्षसाचे विकराल मुख असते. हे दैत्याचे

मुख काश्मीरमध्येच आढळते. याचा अर्थ आसा नव्हे कि, काश्मीरमध्ये त्रिमुख वैकुंठ नाही. या खेरीज षष्ठ्भूज विष्णू-लक्ष्मी आढळतात. अर्धनारी विष्णू हि एक वैशिष्ट्यपुर्ण प्रतिमा आढळते. अर्धनारीश्वर म्हटले की, शिवपार्वतीचीच मूर्ती डोळ्यासमोर येते. पण ही उणीव काश्मीरच्या वैष्णवांनी भरुन काढली आहे. या रूपातील विष्णूला आठ हात आहेत. विष्णूभागातील हातात पद्म , गदा , शंख , चक्र (प्रदक्षिणाक्रमाने ) ही आयुधे दिसतात. तर लक्ष्मी भागात ग्रंथ, आरसा, सनालपद्म, ही आयुधे दिसतात. हा विष्णू गरूडावर आरूढ आहे. (कमलासनावर बसलेल्या गरूडावर ) गरुडारूढ लक्ष्मी नारायण, वामन , विष्णू या प्रतिमा दिसतात,

***दक्षिण भारतीय कला - विष्णू***

दक्षिण भारतातील ऐहोळे, पट्टदकल, महाबलिपूरम, वेरूळ, कांची, सोमनाथपूर,मदुराई, ही प्रमुख केन्द्रे सांगता येतील. कालक्रमानुसार विचार केल्यास चालुक्य, पल्लव, चोल, पाण्ड्य, होयसळ असा राजवंशांचा शिल्पकलेस आश्रय मिळाला.

***विष्णूची वैशिष्ट्ये -***

बहुतेक पाषाणप्रतिमा पाठशिळेवर आहेत.म्हणजे पारिभाषिक शब्दात सांगावयाचे झाल्यास त्या अर्ध्चित्र प्रकारच्या आहेत. काही धातुमूर्ती चित्र प्रकारच्या आहेत. फरक एवढाच की, विष्णूमूर्तीची पाठशिळा ही लंबगोलाकार किंवा चौकोनी नसून मूर्तीचे किरीट , आयुधे , कपडे इ. बाहेर येणा-या भागांना सामावून घेणारिच घडविली जाते.दक्षिणेतील प्रतिमा लांब रूंद उंच आहेत . त्यामुळे त्या भव्य दिसतात. सुरूवातीस पल्लव प्रतिमांचे चेहरे साधे असत. अलंकारही मोजके असत. पण उत्तर पल्लव कालात मात्र विपुल दागिने दिसू लागले . कोरीव काम वाढले,२७ होयसळ मूर्तीत तर पुढचा टप्पा गाठला. दागिन्यामध्ये किरीट, जानवे , नुपूर, इ. उल्लेख करावा लागतो. धोतर मात्र पायघोळ नसते. तर ते पोटरीपर्यंत पोचणारे असते. खांद्यावर उपरणे नसते. प्रतिमा उद्बाहू असतात. विशेष गोष्ट म्हणजे सुरुवातीच्या काळात दिसणारे शंख व चक्र पल्लव काळापासून वेगळे दिसतात. कारण त्यातून बाहेर पडणा-या तेजाच्या ज्वाला दाखविल्या जाऊ लागल्या . गदा , कमल नेहमी हवेतच असा दंडक नव्हता. मूर्तीत गडा नसते . कमळही सामान्य नसते. तर ते उघड्या हातावर शोभणा-या चिमुकल्या फुलासारखे असते. आयुधपुरूष हळुहळू

लयाला गेले. विशेष म्हणजे गदेला स्त्री न दाखविता पुरूष दाखविले आहे. परिवार देवताही कमी होत गेल्या आहेत.

इतर विशिष्ट अवतारात श्रीनिवास हि प्रतिमा दिसते. डावा हात कमरेवर ठेऊन मागील हातात चक्र , शंख घेतलेल्या विष्णूस श्रीनिवास, बालाजी, व्यंकटेश म्हणून ओळखतात. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती दिसतात. हरिहराच्याही प्रतिमा मिळतात. तसेच शेषशायी हा प्रकार दक्षिणेत लोकप्रिय झालेला आहे. द्विभुज, चतुर्भुज, सायुध, निरायुध असे सर्व प्रकार दिसतात. दोन हाती उताणी निजलेली प्रतिमा योगशयन म्हणून ओळखली जाते. यास रंगनाथ असे म्हणतात.

***अवतार -*** राष्ट्रकूटांचे वराह हे राजचिन्हच होते. नृवराह, भूवराह, यज्ञवराह, प्रलयवराह अशा प्रतिमा दिसतात. नरसिंहाचेही गिरीज, स्थौण, केवल, यानक वगैरे प्रकार दिसतात. पल्लव काळापासून त्रिविक्रममूर्ती मिळतात. राम , परशुराम मूर्त्ती फारशा आढळत नाहीत. दाशरथी राम पाषाणापेक्षा धातुमूर्तीत सापदातो. कृष्णाच्या, यशोदाकृष्ण, बाळकृष्ण, नवनीतनट, कालीयकृष्ण, गोवर्धनधर, वेणूगोपाळ अशी रूपे आढळातात. हयग्रीवाच्या धातू व पाषाणमूर्ती आढळतात. अष्टभुज वरदराजही दक्षिणेत दिसतो. महाराष्ट्रात , प्रसिद्ध असलेल्या पांडुरंगाच्याही मूर्ती आढळतात. पाषाण व धातू या दोन्ही स्वरुपात दिसतात. श्रीविष्णू हे महत्वाचे विष्णुशिल्प एका खांबावर दिसते. (त्रिवेंद्रम येथील पद्मनाभस्वामींच्या मंदिरात कुलशेखर मंडपाच्या एका खांबावर )

---

१. जोशी वि ना , श्री सार्थ ज्ञानेश्वरी ;पृ . ६०४
२. केळकर क आ , विदर्भातील प्राचीन मूर्ती ;पान नं १
३. जोशी नि. पु , भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ . ९
४. कित्ता , भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४ ७
५. चित्राव सिद्धेश्वरशास्त्री , ऋग्वेदाचे संपूर्ण मराठी भाषांतर, पृ.
६. कित्ता, ऋग्वेदाचे संपूर्ण मराठी भाषांतर, पृ.
७ .भावे विनोबा , ऋग्वेदसार मराठी अनुवाद पृ.
८. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोष. खंड ८ वा पृ ७८९
९. कित्ता, भारतीय संस्कृती कोष. खंड ८ वा पृ ७८९
१०. कित्ता, भारतीय संस्कृती कोष. खंड ८ वा पृ ७९३
११. कित्ता, श्री सार्थ ज्ञानेश्वरी ;पृ .३२२.
१२. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४६

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१३. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४६
१४. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४७
१५. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४७
१६. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४८
१७. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४८
१८. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .४८
१९. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ . ५०
२०. जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, पृ. ६५
२१. करंदीकर ज. ग., भग्वदगीता, पृ .१९०
२२. स्मृतीसंदर्भ २ ,श्लोक १४३, पृ. ११८३
२३. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .१०४
२४. कित्ता, भारताची मूर्तिकला, पृ. ६७
२५. कुलकर्णी एस. के. , देव भार्गवराम , पृ. २१
२६. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .७१
२७, कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .७१
२८. . कित्ता, भारताची मूर्तिकला, पृ. ७०
२९. साधले आनंद , जयदेव गीतगोविंद पृ . ९
३०. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .११९
३१. कित्ता, भारताची मूर्तिकला, पृ.५७
३२. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .७९
३३. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .९०
३४. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .९०
३५. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .९०
३६. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .९०
३७. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .९८
३८. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .१०२
३९. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .११०
४०. कित्ता, भारतीय मूर्तीशास्त्र ;पृ .११६